❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती सोमवार, दि. ०७ सप्टेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २५३ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# डीजेविरोधात पुणेकर एकवटले!

## बालगंधर्व चौक ते पुणे महापालिकेपर्यंत निषेध मोर्चा; ध्वनीप्रदूषणावर कारवाईची मागणी

■ पुणे (दै. संध्या)

कर्णकर्कश डीजे आणि ध्वनीप्रदूषणाविरोधात पुणेकर रविवारी रस्त्यावर उतरले. सकाळी बालगंधर्व चौक येथून जंगली महाराज रस्त्याने पुणे महानगरपालिकेपर्यंत निषेध मोर्चा काढण्यात आला. 'डीजे बंदी झालीच पाहिजे' अशा घोषणा देत नागरिकांनी ध्वनीप्रदूषणाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. 'लाऊडस्पीकरविरोधी पुणेकर मंचा'च्या वतीने हा मोर्चा काढण्यात आला. मोठ्या प्रमाणात पुणेकर यात सहभागी झाले होते.

धार्मिक, जातीय किंवा राजकीय मिरवणुका आणि उत्सवांमध्ये नियमांचे उल्लंघन करून वाजविण्यात येणाऱ्या कर्णकर्कश लाऊडस्पीकर, डीजे आणि तत्सम ध्वनीयंत्रणांवर बंदी आणावी, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली. याबाबत पोलीस आयुक्त, महापालिका आयुक्त आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सदस्य सचिवांना निवेदन देण्यात आले.




कार्यक्रम झाल्यानंतर नोटिसा बजावणे, ध्वनीयंत्रणा जप्त करणे किंवा काही दिवसांनी गुन्हा दाखल करण्याऐवजी कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. नियोजित कार्यक्रमाच्या काही तास आधी पोलीस, महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संयुक्त पथकांनी कार्यक्रमस्थळ, ध्वनीयंत्रणा उभारण्याची ठिकाणे आणि मिरवणुकीच्या प्रारंभस्थळाची तपासणी करावी. नियमबाह्य साऊंड सिस्टीम, स्पीकर वॉल अथवा जनरेटर आढळल्यास गर्दी जमण्यापूर्वीच ते थांबवून जप्त करावेत, अशी मागणी करण्यात आली.याशिवाय प्रभागनिहाय नियुक्त अधिकाऱ्यांची संपर्क क्रमांकांसह यादी जाहीर करावी, ध्वनीपातळीची माहिती नागरिकांना रिअल टाइममध्ये उपलब्ध करून द्यावी आणि ध्वनीप्रदूषणाच्या तक्रारी व त्यावर झालेल्या कारवाईचा दैनिक अहवाल प्रसिद्ध करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

'४ टॉप, ४ बेस' या ध्वनीयंत्रणेच्या रचनेमुळे ६५ डेसिबलच्या अनुज्ञेय मर्यादेचे पालन कसे होते, याचा तांत्रिक आधार प्रशासनाने स्पष्ट करावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. ध्वनीप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाल्यास त्याची जबाबदारी निश्चित करून नुकसानभरपाईची तरतूद करण्याची मागणीही aकरण्यात आली. नागपूर आणि सोलापूरमध्ये ध्वनीप्रदूषणाच्या नियमांची अंमलबजावणी होत असेल, तर पुण्यातच मोकळे रान का, असा सवालही आंदोलकांनी उपस्थित केला. डीजेच्या कर्णकर्कश आवाजाचा त्रास केवळ माणसांनाच नव्हे, तर मुक्या प्राण्यांनाही होतो, याकडे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनात प्राण्यांशी संबंधित संदेश असलेल्या फलकांचाही वापर करण्यात आला. पाळीव प्राण्यांना मोठ्या आवाजामुळे होणारा त्रास अधोरेखित करत नागरिकांनी प्राण्यांच्या संरक्षणासाठीही आवाज उठवला.

### तरुणांचा सहभाग कमी

डीजेला विरोध करण्यासाठी झालेल्या या आंदोलनात प्रौढ नागरिकांचा प्रतिसाद तुलनेने अधिक दिसून आला. चाळिशीपुढील नागरिकांची संख्या लक्षणीय होती. त्याच्या तुलनेत तरुणांचा सहभाग कमी असून, अंदाजे १५ ते २० टक्के तरुण आंदोलनात सहभागी झाल्याचे दिसून आले. डीजेच्या दुष्परिणामांबाबत तरुणांमध्ये जनजागृतीची गरज असल्याचेही यावेळी बोलले जात होते.

'नागरिकांचा कोणत्याही सण-उत्सवाला विरोध नाही; विरोध अमर्याद आणि अतिरेकी डीजे-डॉल्बीला आहे. जीवघेणा आवाज थांबवायला हवा.'
**– राहुल डंबाळे, सामाजिक कार्यकर्ते.**

'केवळ गणेशोत्सव नाही, तर इतर सर्व धार्मिक, जातीय आणि राजकीय मिरवणुका व उत्सवांमधील बेकायदेशीर कर्णकर्कश लाऊडस्पीकर आणि आरोग्यास घातक ध्वनीप्रदूषण करणाऱ्या उपकरणांवर बंदी आणावी.'
**- मुकुंद किर्दत, सामाजिक कार्यकर्ते.**

## संध्या प्रहार




## थोडक्यात...

### डीजे बंदी झालीच पाहिजे : संजय शिरसाट

मुंबई : दैनिक संध्या

सध्या राज्यामध्ये गणेशोत्सवाच्या आगमनाचे वेध लागले आहेत. पुढील आठवड्यामध्ये गणरायाचं आगमन होणार आहे. त्यापूर्वीच गेल्या आठवड्यापासून राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे, ज्याला पार्श्वभूमी आहे ती डीजेची. डीजेमुळे नाहक त्रास होतो, अशा भूमिकेतून राज्यातील अनेक सामाजिक कार्यकर्ते त्यांची मतं मांडत आहेत. या सगळ्यांची सुरुवात पुण्यातून झाली. पुण्यातील विद्यानंद बापटांनी सार्वजनिक उत्सवांमध्ये डीजे आणि लाऊडस्पीकर नसावेत अशी भूमिका सर्वात आधी मांडली होती. त्यानंतर ते सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले. अनेक मुलाखतींमधून त्यांचं मत मांडलं. तर दुसरीकडे नागपुरात गणेशोत्सवाच्या काळात डीजेवर बंदी घालण्यात आली आहे. दरम्यान, आता शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी डीजेबंदीचं जाहीर समर्थन केलं आहे. त्यांनी टीव्ही9 मराठीशी संवाद साधला. यावेळी संजय शिरसाट म्हणाले की,"डीजे बंदीमुळे काही लोकांना वाईट वाटत असेल तर वाटू द्या. कारण लहान बालकं, वयोवृद्ध लोक असतील तसेच आजारी लोक असतील त्यांना याचा प्रचंड त्रास होतो. लहान मूलं मिरवणुकीत येत नाहीत. ते मिरवणुका पाहुही शकत नाहीत. ज्या ज्या ठिकाणावरुन मिरवणूक जाते. तेथील लोकांना त्याचा त्रास असतो, हे आपण नाकारु शकत नाही, " असं शिंदेंचे मंत्री संजय शिरसाट म्हणाले आहेत. नागरिकांचे आरोग्य आणि सुरक्षितता महत्त्वाची असल्याने गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन त्यांनी गणेश मंडळांना केले. छत्रपती संभाजीनगरसारख्या संवेदनशील शहरात यंदाही डीजे वाजणार नाही, असे शिरसाट यांनी स्पष्ट केले. पारंपरिक वाद्यांच्या साथीनेही उत्साहात गणेशोत्सव साजरा करता येतो, असे त्यांनी सांगितले.

### गणेशोत्सवात डीजेवर बंदी आणली जाणार का?

पुणे : दैनिक संध्या

पुण्यात गणेशोत्सवात डीजे बंदीच्या मागणीवरून वाद पेटला आहे. एकीकडे काही नागरिकांकडून डीजे बंदीची मागणी केली जात आहे. तर दुसरीकडे गणेश मंडळाकडून डीजे बंदीच्या मागणीला विरोध होत आहे. सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांनीही हा मुद्दा लावून धरला आहे. डीजे बंदीची मागणी करत असताना त्यांना गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या रोषालाही सामोरे जावं लागले. त्यानंतरही त्यांनी डीजे बंदीची मागणी लावून धरली आहे. बापट यांच्यानंतर आता काही नागरिकांनी पुढे येऊन पुणे महानगरपालिकेवर मोर्चा काढला. पुण्यात आज रविवारी लाऊड स्पीकरविरोधात पुणेकर मंचाने मोर्चा काढला. या मोर्चात सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट सहभागी झाले नाही. विद्यानंद बापट यांच्या निवासस्थानावर पोलिसांचा बंदोबस्त होता. विद्यानंद बापट यांनी मोर्चामध्ये सामील न होण्याची माहिती पोलिसांना दिली. बालगंधर्व चौक ते महानगरपालिका असा मोर्चा निघाला. या मोर्चातील नागरिकांनी पुणे पोलिसांना डीजे बंदीसाठी निवेदन दिलं. त्यानंतर पुणे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले म्हणाले, तुम्ही बघत आहात की, डीजेविरोधातील मोर्चा बालगंधर्व, पुणे मनपापर्यंत आला आहे. साधारण तीनशे ते साडे तीनशे जण आहेत. त्यांनी डीजेच्या विरोधात मोर्चा काढला. त्यांनी एक निवेदन देखील दिलं आहे. त्यांच्या मागणीचा विचार करणार आहोत. 'सुप्रीम कोर्टाचे मार्गदर्शक तत्त्वे आहेत. लाऊड स्पीकरमुळे ध्वनीप्रदुषण होतं, यासाठी पोलीस आयुक्तांनी प्रत्येक झोनमध्ये बैठका घेऊन प्रत्येक गणेश मंडळांना सूचना दिल्या आहेत.

# राज ठाकरेंनी भावाकडं ज्ञान पाजळावं

## शिवसेना भवनमधील फोटो प्रोटोकॉल प्रमाणे आहे का?

■ मुंबई (दै. संध्या)

आपल्या मुलावर गुन्हा दाखल झाल्यानंतर राज ठाकरेंना किती मिरची लागली. संदीप देशपांडे साहेबांना अटक झाल्यावर कार्यक्रम घेऊन ते बोलले नाहीत. शेजारी आणि आपले कोण हे त्यांना कळतं असे म्हणत ॲड गुणरत्न सदावर्ते यांनी राज ठाकरेंवर टीका केली. राज ठाकरेंनी स्वतःच्या भावाकडे ज्ञान पाजळावं. शिवसेना भवनच्या आतमधील फोटो प्रोटोकॉल प्रमाणे आहे का? असा सवाल सदावर्तेंनी केला. छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो एकत्र आहे. राज ठाकरे तुम्ही किती मिनिटात किती तासात हे फोटो काढता? असा सवाल सदावर्तेंनी केला. राज ठाकरे यांची अवस्था लोका सांगे ब्रम्हज्ञान अशी झाल्याचे सदावर्ते म्हणाले. शिवसेना भवनवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावर बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो आहे. त्यांचा फोटो मोठा आहे, ते वर ठेवले जाऊ शकतात का? असा सवाल यावेळी सदावर्तेंनी केला. सांगा त्या उद्धवला बाळासाहेबांचा तो फोटो काढायला. हा अपमान सहन केला जाणार नाही. तमाम छत्रपती शिवाजी महाराज यांना मानतात त्यांना विनंती करतो, मी यांना 15 दिवसांची मुभा देतो. 15 दिवसांत जर हा फोटो काढला नाही तर मी स्वतः न्यायालयामार्फत स्ट्रगल करु, वेळप्रसंगी मी उपोषण करेल असा इशारा सदावर्तेंनी दिला. भीम जयंती हीच दिवाळी, DJ वाजणार असेही सदावर्ते म्हणाले. कायद्याची पायमल्ली कोणी करत नाही. राज ठाकरेंना आव्हान आहे की DJ बंद करुन दाखवा असे सदावर्ते म्हणाले. राज ठाकरेंच्या डोक्याचा खोका खाली आहे का? असा सवाल सदावर्तेंनी केला. DJ वाजवण्यावर बंदी नाही आली पाहिजे, DJ संदर्भात कोणाला त्रास देत असेल तर मला कॉल करा असेही सदावर्ते म्हणाले.



■ १५ दिवसात तो फोटो काढा अन्यथा... सदावर्तेंचा ठाकरेंना इशारा

# आयोगातल्या व्यक्तीलाही कठोर शिक्षा : मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

देशातील नीट पेपरफुटीनंतर देशभरात मोठं आंदोलन झाल्याचं पाहायला मिळालं, दिल्लीतील जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनास देशभरातून पाठिंबा मिळाल्याने अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेण्यात आला. मात्र, त्यानंतरही महाराष्ट्रात सीईटी आणि MPSC पेपरफुटीच्या घटना घडल्या. सर्वात पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा म्हणून एमपीएससीकडे पाहिले जाते. मात्र, एमपीएससीच्या औषध निरीक्षकपदासाठीचा पेपर फुटल्याने पुन्हा एकदा पेपरफुटी चव्हाट्यावर आली. याप्रकरणी, पोलिसांनी आत्तापर्यंत 6 हून अधिक आरोपींना अटक केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षा शिक्षक आणि विद्यार्थी शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली.



एमपीएससी परीक्षा पद्धती संदर्भात स्पर्धा परीक्षा शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे एक शिष्टमंडळ सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. यावेळी, विद्यार्थ्यांनी काही मागण्या केल्या. यामध्ये शिक्षक सचिन ढवळे, यशवंत सोलाट, धनंजय मते, गणेश कड, उमेश कुदळे, विद्यार्थी चळवळीतील कार्यकर्ते निखिल पाटील यांच्यासह स्पर्धा परीक्षा शिक्षक-विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या मागण्यांना प्राधान्यक्रम देत, MPSC पेपरफुटीच्या गैरप्रकारात आयोगातील किंवा आयोगाबाहेरील ज्या व्यक्तींचा सहभाग आढळेल, त्या सर्वांना कठोर शिक्षा केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले की, अतिशय पारदर्शी पद्धती विकसित करण्यासाठी सरकार सातत्याने काम करते आहे. ही प्रक्रिया अधिक कशी सुदृढ करता येईल यासाठी राज्यस्तरावर एक उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली आहे. त्यात युपीएससीचे माजी सदस्य, पोलिस महासंचालक, आयआयटी प्राध्यापक आणि इतर अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्याचा शासन आदेश सुद्धा निर्गमित करण्यात आला असून ही समिती राज्यभर सर्व विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि सर्व संबंधितांशी सल्लामसलत प्रक्रिया करणार आहे. पुण्यात सुद्धा ही समिती जाईल. एकीकडे हे प्रयत्न होत असताना काही कठोर कायदे सुद्धा करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्यांवर सरकार कठोर कारवाई करेल. औषध निरीक्षक परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणाची सुद्धा गंभीर दखल घेण्यात आली असून या प्रकरणाचा पोलिसांकडून गतिमान तपास सुरू आहे. आरोपींना अटक देखील करण्यात आली आहे. याचा पुढील तपास सुरुच असून या गैरप्रकारात आयोगातील किंवा आयोगाबाहेरील ज्या व्यक्तींचा सहभाग आढळेल, त्या सर्वांना कठोर शिक्षा केली जाईल. स्पर्धा परीक्षांसाठी प्रामाणिकपणे मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कष्टांचे चीज होईल, अशाच सुधारणा आम्ही करीत आहोत. त्यांच्यावर कुठलाही अन्याय होऊ दिला जाणार नाही. विद्यार्थ्यांच्या मनातील संभ्रम दूर करून परीक्षाव्यवस्थेवरील विश्वास कायम राहावा, यासाठी शासन कटिबद्ध आहे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रश्नपत्रिका निर्मितीपासून परीक्षा प्रक्रियेपर्यंत आवश्यक त्या सुधारणा सर्व घटकांना विश्वासात घेऊन तातडीने अंमलात आणल्या जातील, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी त्यांना आश्वस्त केले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींची मंत्र्यांसोबत तातडीची बैठक!

## *कामगिरीचा हिशोब होणार; मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चेनंतर घडामोडी वाढल्या!*

■ मुंबई (दै. संध्या)

विविध मंत्रालयांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी सायंकाळी महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत विशेषतः सामाजिक न्याय आणि सामाजिक कल्याण क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी सायंकाळी या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील. या बैठकीत विविध मंत्रालये, मंत्री आणि त्यांच्या एकूण कामगिरीचे मूल्यमापन केले जाणार आहे. या आढावा बैठकीसाठी सामाजिक न्याय आणि सामाजिक कल्याणाशी संबंधित मंत्रालयांचा कार्यभार असलेल्या काही निवडक राज्यमंत्र्यांना आणि स्वतंत्र प्रभार असलेल्या राज्यमंत्र्यांना बोलावण्यात आले आहे. त्यामुळे या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



उद्याच्या बैठकीत ज्या मंत्रालयांच्या कामकाजावर विशेष लक्ष दिले जाणार आहे, त्यामध्ये शिक्षण मंत्रालय, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, कृषी मंत्रालय यांसह अन्य संबंधित मंत्रालयांचा समावेश आहे. या बैठकीत मंत्र्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाणार असून, त्यांच्या जबाबदारीबाबतही चर्चा होणार आहे. येत्या काही दिवसांत राज्यमंत्र्यांच्या इतर गटांसोबतही अशाच प्रकारच्या बैठका होणार आहेत. या बैठकांचा संबंध राज्यमंत्र्यांच्या कामगिरीशी जोडला जात असून, भविष्यात होणाऱ्या केंद्रीय मंत्रिमंडळातील फेरबदलावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मंत्रिमंडळ विस्तार किंवा फेरबदलाच्या वेळी अशा प्रकारच्या कामगिरीच्या आढाव्याची प्रक्रिया यापूर्वीही होत आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबरमध्ये जलशक्ती मंत्रालयाच्या दोन दिवसीय राष्ट्रीय शिखर परिषदेच्या समारोप सत्राचे अध्यक्षस्थान भूषवले होते. यावेळी त्यांनी परिषदेत मांडण्यात आलेल्या सूचनांची ठरावीक वेळेत अंमलबजावणी करण्यात यावी, असे सांगितले होते. तसेच, या कामांचा सातत्याने आढावा घेण्याची गरज असल्याचेही पंतप्रधानांनी स्पष्ट केले होते. यामुळे आवश्यकतेनुसार सुधारणा करता येतील, असे त्यांनी म्हटले होते.

शहरांची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची वाढती गरज यांसारख्या आव्हानांबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना सजग करण्याची गरज असल्याचेही मोदी यांनी सांगितले. शहरी भागातील पाण्याची गरज लक्षात घेऊन अधिक चांगले नियोजन आणि तयारी करण्यावर त्यांनी भर दिला.पाणी बचतीच्या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन ही पंतप्रधानांनी केले. भारतीय उत्पादक आणि संबंधित क्षेत्रातील व्यक्तींना अधिक प्रभावी आणि परिणामकारक उपाय विकसित करण्यासाठी तसेच ते मोठ्या प्रमाणावर लागू करण्यासाठी मदत करण्याच्या उद्देशाने विशेष प्रदर्शन आणि कार्यशाळा आयोजित करण्याची सूचनाही त्यांनी केली.

# दिल्लीत पाच मजली इमारत कोसळली

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

देशाची राजधानी नवी दिल्ली येथील सत्य निकेतन मधील इमारत कोसळल्यानं एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तर, 3 विद्यार्थी जखमी झाले आहेत. घटनास्थळावरील प्रत्यक्षदर्शींच्या मते जेव्हा इमारत कोसळली तेव्हा 40-45 लोक इमारतीत होते. प्रत्यक्षदर्शींच्या अंदाजानुसार 30-35 विद्यार्थी अडकल्याची शक्यता आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार आज सुट्टी असल्यानं या इमारतीत विद्यार्थी अधिक संख्येनं असतील. बचाव कार्य सुरु असून ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. ही इमारत मोतीबाग भागातील सत्य निकेतन जवळच्या शिव मंदिराजवळ कोसळली आहे. दिल्लीतील सत्य निकेतनमधील पाच मजली इमारत कोसळली आहे. घटनास्थळी अग्निशमन विभाग, दिल्ली पोलीस, एनडीआरएफची पथकं पोहोचली आहेत. घटनास्थळावर स्थानिक लोक देखील प्रशासनाला सहकार्य करत आहे. जेसीबीचा वापर करत ढिगारा बाजूला केला जात आहे. या इमारतीच्या ढिगाऱ्यात विद्यार्थी अडकल्याची शक्यता असल्यानं नेमके किती जण अडकले आहेत, ते स्पष्ट झालेलं नाही. कोसळलेल्या इमारतीपासून जवळच दिल्ली विद्यापीठाचा साउथ कॅम्पस आहे. यामुळं अनेक विद्यार्थी त्या इमारतीमध्ये वास्तव्यास असल्याचा अंदाज आहे. दिल्ली पोलिसांचं पथक घटनास्थळी पोहोचलं आहे. बचाव पथकांकडून शोध मोहीम सुरु करण्यात आली आहे. स्थानिक लोकांनी म्हटलं की त्यांनी तातडीनं बचाव कार्यात मदत सुरु केली आहे. ढिगाऱ्यात अडकलेल्यांना वाचवण्यासाठी जी साधनं उपलब्ध होतील त्यानं ढिगारा बाजूला करण्याचा प्रयत्न केला.

## संपादकीय

# तरुणांच्या स्वप्नांशी खेळ थांबणार कधी?

सरकारी नोकरी मिळविण्याचे स्वप्न आजही महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या डोळ्यांत आहे. गरीब घरातील मुलगा असो, शेतकऱ्याचा मुलगा असो किंवा मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगी वर्षानुवर्षे अभ्यास करून, असंख्य अडचणींवर मात करून आणि स्वतःच्या भविष्याची आशा मनात ठेवून हे तरुण स्पर्धा परीक्षांच्या मैदानात उतरतात. मात्र, परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांच्या बातम्या समोर आल्या की प्रश्न केवळ एका परीक्षेपुरता राहत नाही; तो संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर येऊन थांबतो. महाराष्ट्रातील भरती परीक्षांमध्ये पारदर्शकता आणि सुरक्षितता वाढविण्यासाठी राज्य सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. विद्यार्थ्यांपासून पालक, शिक्षक, कोचिंग संस्था आणि लोकप्रतिनिधींपर्यंत विविध घटकांकडून सूचना मागविण्यात येत आहेत. हा निर्णय स्वागतार्ह आहे. परंतु प्रश्न असा आहे की, विश्वास तुटल्यानंतर समित्या नेमणे पुरेसे आहे का?

MPSC भरती प्रक्रियेतील कथित पेपरफुटीप्रकरणी तपास सुरू असून, गुन्हे शाखेने या प्रकरणात अनेक आरोपींवर कारवाई केली आहे. तपासात प्रश्नपत्रिकेतील सामग्रीच्या कथित गैरवापराचा मुद्दाही समोर आला आहे. या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेली अस्वस्थता केवळ आंदोलन करून किंवा आश्वासन देऊन दूर होणार नाही. कारण एका विद्यार्थ्याच्या मागे त्याचे अनेक वर्षांचे आयुष्य उभे असते. एक विद्यार्थी परीक्षेची तयारी करताना नोकरी करत असेल तर त्याची कमाई अभ्यासासाठी कमी होते. दुसरा विद्यार्थी कर्ज काढून पुणे, मुंबई किंवा अन्य शहरात येतो. कुणाचे आई-वडील शेती विकून मुलाला शिकवतात. कुणी घरातील जबाबदाऱ्या सांभाळत रात्रभर अभ्यास करतो. एखाद्या परीक्षेच्या निकालावर त्याचे पुढील पाच-दहा वर्षांचे आयुष्य अवलंबून असते. अशा परिस्थितीत जर प्रश्नपत्रिका फुटल्याची, पेपर तपासणीत घोळ झाल्याची किंवा परीक्षेच्या प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याची शंका निर्माण झाली, तर नुकसान केवळ काही गुणांचे होत नाही. नुकसान होते ते विश्वासाचे. आणि लोकशाहीतील कोणत्याही संस्थेसाठी विश्वासापेक्षा मोठी संपत्ती नसते. सरकारने आता केवळ दोषींना शोधून शिक्षा देण्यापलीकडे जावे लागेल. परीक्षा प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक सुरक्षित करावा लागेल. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ती परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचेपर्यंत कोणकोणत्या व्यक्तींचा संपर्क येतो, डिजिटल नोंदी कशा ठेवल्या जातात, प्रश्नपत्रिकेची सुरक्षा कशी केली जाते, परीक्षा केंद्रातील निरीक्षण किती सक्षम आहे या सर्व प्रक्रियेचे स्वतंत्र ऑडिट झाले पाहिजे.

त्याहून महत्त्वाचे म्हणजे, चूक झाली तर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. प्रशासनातील एखाद्या व्यक्तीच्या निष्काळजीपणामुळे किंवा संगनमतामुळे हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान होत असेल, तर त्याला केवळ निलंबनाची शिक्षा पुरेशी आहे का, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. दोष सिद्ध झाल्यास कठोर आणि वेळेत शिक्षा झाली पाहिजे. कारण परीक्षा गैरव्यवहार हा केवळ प्रशासकीय दोष नसून तरुणांच्या भवितव्यावर केलेला गंभीर आघात आहे. याचबरोबर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांकडेही केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे चुकीचे ठरेल. विद्यार्थी प्रश्न विचारत आहेत म्हणजे ते कोणाच्या बाजूचे आहेत, यापेक्षा त्यांचा प्रश्न योग्य आहे का, हे महत्त्वाचे आहे. राजकीय पक्षांनीही विद्यार्थ्यांच्या वेदनेचे राजकारण करण्याऐवजी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी एकत्र यायला हवे. सत्ताधाऱ्यांनी विरोधकांच्या आरोपांना उत्तर देण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या शंकांना उत्तर देणे अधिक महत्त्वाचे आहे. विरोधकांनीही प्रत्येक प्रकरणाचे राजकीय भांडवल करण्याऐवजी तथ्याधारित भूमिका घेणे गरजेचे आहे. आजच्या तरुण पिढीसमोर आधीच रोजगाराचे मोठे आव्हान आहे. त्यात सरकारी नोकरीच्या परीक्षांबद्दलही विश्वास उरला नाही, तर व्यवस्थेपासून तरुणांचा भ्रमनिरास होणे स्वाभाविक आहे.

## संस्कृत सुभाषित

वासनानां क्षयश्चात स्वाध्यासापनमं कुरू।।

अर्थ : मन निरंतर स्वस्वरूपीच राहून लयास जाते आणि त्यामुळेच वासनांचा क्षय होतो. म्हणून मनोविजय प्राप्त कर असे सांगितले आहे.

## गुरु वचन

### आईच्या संरक्षणासाठी जीव दिला

मनुष्याच्या विकासात आई-वडिलांची महत्वाची भूमिका असते. ते मुलांना वाढवतात व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास सक्षम बनवतात. तसेच मरेपर्यंत आपल्या मुलांच्या कल्याणाचीच प्रार्थना करतात.

जगातील सर्व देवता, पैगंबर, साधु-संत व महापुरुषांनी आई-वडिलांच्या सेवेस पुण्य कर्म संबोधले आहे. भगवान बुद्धांनी देखील या सत्याचा अनुभव केला होता म्हणून त्यांनी जीवनात आई-वडिलांना महत्वपूर्ण स्थान दिले. आपल्या उपदेशात ते नेहमी आई-वडिलांची सेवा करण्यास सांगत होते. बौद्ध धर्माचा ग्रंथ सुत्तानिपातच्या पराभव सुत्तात भगवान बुद्धांनी देवास उपदेश देत सांगितले आहे की, जो व्यक्ती आपल्या आई-वडिलांचा सांभाळ किंवा पालन-पोषण करत नाही, त्याचा नाश निश्चित असतो. या ग्रंथाच्या महामंगल सुत्तात बुद्ध म्हणतात की, आई-वडिलांची सेवा करणे सर्वोच्च मंगल कार्य आहे. धम्मिक सुत्तात गृहस्थ धर्माची व्याख्या करत ते सांगतात की, जो धर्मानुसार आई-वडिलांची सेवा करतो, तो स्वयंप्रभ नावाच्या देवलोकात उत्पन्न होतो.

बौद्ध धर्माचा प्रसिद्ध ग्रंथ धम्मपदात बुद्ध सांगतात, जगात आई-वडिलांची सेवा सुखकर असते. बुद्धांनुसार आई-वडिलांचे स्थान सर्वोच्च असते. आई-वडिल आपल्या मुलांचे पालनपोषण करुन मोठे करतात, त्यांना जीवनात अग्रेसर राहण्यासाठी समर्थ बनवतात व जीवनभर त्यांना आशिर्वाद देतात. आई-वडिल वृद्ध व असहाय झाल्यावर त्यांची सेवा करणे मुलांचे नैतिक कर्तव्य असते. जर त्यांनी नैतिक कर्तव्याचे पालन केले नाही तर ते अधर्माचे भागीदार होतात व समाजात त्यांची निंदा होते.

बुद्ध याबाबतीत खुप संवेदनशील होते म्हणून त्यांनी व्यवस्था दिली की, व्यक्ती आपल्या आई-वडिलांच्या परवानगीशिवाय भिख्खुसंघात दीक्षा घेऊ शकत नाही. याचे तात्पर्य व्यक्ती आपल्या आई-वडिलांप्रती कर्तव्य सोडून भिक्खु बनू शकत नाही. बुद्धांने गृहस्थासाठी दिलेल्या तत्वात आई-वडिलांची सेवा प्रथम होती.

प्राचीन भारतात आई-वडिलांची सेवा सर्वात मोठे मूल्य मानले जात होते. या मूल्याच्या प्रचार-प्रसारासाठी पुराण व बौद्ध जातक कथांमध्ये अनेक प्रसंग मिळतात, ज्याच्या माध्यमातून यास जास्त व्यावहारिक बनवले जाऊ शकेल. श्रवणकुमारची गोष्ट सर्वांना माहित आहे. येथे अनेक लोककथा व लोकगीतांमध्ये आई-वडिलांच्या सेवाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातक कथांमध्ये असे अनेक संदर्भ मिळतात, ज्यात बोधिसत्वांनी आपल्या आई-वडिलांच्या सेवेत जीवनाची आहुती दिली होती. चुल्लनन्दिय जातकात बोधिसत्व हिमालयात नन्दिय वानर होते. त्यास छोटा भाऊ होता. ते दोघे ८० हजार वानरांचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्या आंधळ्या आईची सेवा पूर्ण वेळ करु शकत नव्हते म्हणून त्यांनी वानरांचे नेतृत्व सोडून पूर्ण वेळ आईची सेवा करण्यास सुरुवात केली.

एकेदिवशी एक शिकारी, शिकारीच्या शोधात बोधिसत्व आई व छोट्या भावासह राहत असलेल्या झाडाखाली आला. शिकारीचे लक्ष त्याच्या आईकडे गेले व त्याने आईच्या दिशेने बाण साधला. मातृभक्त नन्दिय शिकारीसमोर येऊन म्हणाला की, हवं तर मला मार पण माझ्या आईला सोड. निर्दयी शिकारीने बोधिसत्वाची हत्या केली. त्यानंतर शिकारीने छोटा भाऊ व आईला मारले.

आई, बोधिसत्व व भावाच्या हत्येच्या महापापामुळे त्यावेळी भयंकर वादळ आले, ज्यात शिकारीचे संपूर्ण कुटूंब मरण पावले. नंतर तुटलेल्या घराच्या खांबाखाली दबून तो पापी शिकारी सुद्धा मरण पावला.

आज काही लोक आपल्या आई-वडिलांना घराबाहेर काढतात. काही त्यांची संपत्ती बळकावून त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात. पण त्यांना हे माहित नसते की, त्यांचे मुलं भविष्यात त्यांच्यासोबत असाच व्यवहार करतील.

## पंचांग

| पंचांग | कृष्ण पक्ष |
|---|---|
| ७ सप्टेंबर २०२६ | तिथि:एकादशी |
| सोमवार | १७:०४:२४ |
| विक्रम संवत्- २०८२ | नक्षत्र:पुनर्वसु १८:१३:४६ |
| आषाढ शके | योग:व्यतीपात ०६:४०:२३ |
| संवत्- १९४८ | योग:वारीयन |
| संवत्सर -पराभवनाम | २७:३७:३६+ |
| अयन- दक्षिणयन | करण:बालव १७:०४:२४ |
| मास- आषाढ | करण:कौलव |
| ऋतु- सौर शरद | २७:५३:०१+ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०६२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | 6 | | | 4 | 7 | | |
| | 5 | 4 | 7 | | | 2 | | 1 |
| 7 | | | 1 | 2 | | | | |
| 3 | | | | 1 | | | | |
| 1 | 9 | 8 | | 6 | | 3 | 7 | 5 |
| | | | | 5 | | | | 4 |
| | | | | 7 | 3 | | | 9 |
| 4 | | 3 | | | 1 | 5 | 2 | |
| | | 1 | 2 | | | 8 | | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०६१ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 6 | 7 | 5 | 1 | 4 | 9 | 3 | 2 |
| 1 | 3 | 5 | 8 | 2 | 9 | 7 | 4 | 6 |
| 2 | 4 | 9 | 3 | 6 | 7 | 1 | 5 | 8 |
| 7 | 5 | 4 | 6 | 8 | 2 | 3 | 1 | 9 |
| 3 | 2 | 8 | 9 | 7 | 1 | 4 | 6 | 5 |
| 6 | 9 | 1 | 4 | 5 | 3 | 2 | 8 | 7 |
| 9 | 1 | 6 | 7 | 3 | 5 | 8 | 2 | 4 |
| 4 | 8 | 3 | 2 | 9 | 6 | 5 | 7 | 1 |
| 5 | 7 | 2 | 1 | 4 | 8 | 6 | 9 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८२२ – ब्राझीलने पोर्तुगालचे वर्चस्व झुगारून स्वातंत्र्य घोषित केले.
- २००२ – सेरेना विल्यम्सने व्हीनस विल्यम्सचा पराभव करून अमेरिकी खुले विजेतेपद मिळविले.

### राष्ट्रीय

- १७४१ – माळव्याचा कारभार पेशव्यांच्या हाती सोपविण्यात आला.
- १९०६ – पहिल्या स्वदेशी व्यापारी बँकेची – बँक ऑफ इंडिया ची स्थापना झाली.
- १९३१ – दुसऱ्या गोलमेज परिषदेस भारताचे प्रतिनिधी म्हणून महात्मा गांधी उपस्थित.
- १९३५ – इंदूरच्या महाराजांनी संस्थानातील सर्व हरिजन मुलांना शैक्षणिक फी माफ केली.

### जन्म

- १५३३ – एलिझाबेथ पहिली, ईंग्लंडची राणी.
- १८३६ – हेन्री कॅम्पबेल-पुलमन, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
- १८५७ – जॉन मॅकइलरेथ, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १८७१ – जॉर्ज हर्स्ट, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८९४ – व्हिक रिचर्डसन, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९११ – टोडोर झिव्कोव्ह, बल्गेरियाचा हुकुमशहा.
- १९१२ – डेव्हिड पॅकार्ड, अमेरिकन संशोधक, उद्योगपती.
- १९१४ – नॉर्मन मिचेल-इनेस, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९३० – बोद्वाँ पहिला, बेल्जियमचा राजा.

### निधन

- १३१२ – फर्डिनांड चौथा, कॅस्टिलचा राजा.
- १४९६ – फर्डिनांड दुसरा, नेपल्सचा राजा.
- १५५२ – गुरु अनंग देव, दुसरे शीख गुरु.
- १६३२ – सुसेन्योस, इथियोपियाचा स्म्राट.

## : SMS :

Biwi-Pati wala:
Pati: Suno, khana bana do.
Biwi: Alexa se bolo.
Pati ne Alexa se bola - Alexa khana bana de.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.८ | २२.७ |
| अहमदनगर | ३०.८ | २१.७ |
| अकोला | ३३.६ | २५.१ |
| अमरावती | ३१.२ | २४.२ |
| बीड | ३६.५ | २५.४ |
| भंडारा | ३२.८ | २४ |
| बुलढाणा | ३२.९ | २५.७ |
| चंद्रपूर | ३६.४ | २५.७ |
| चेन्नई | ४२.४ | ३०.७ |
| नवी दिल्ली | ३३.७ | २७.१ |
| धुळे | ३४.१ | २४.४ |
| गोंदिया | ३१.२ | २३.७ |
| जळगाव | ३१.९ | २४.७ |
| कोल्हापूर | २९.७ | २२ |
| लातूर | ३२.२ | २२.५ |
| मुंबई | ३४ | २७.५ |
| नागपूर | ३२.८ | २४ |
| नांदेड | ३४.९ | २५ |
| नंदूरबार | ३१ | २४.१ |
| नाशिक | २८.६ | २२.९ |
| पुणे | २६.६ | २१.७ |
| पंढरपूर | ३४.२ | २२.९ |
| सातारा | ३०.७ | २१.१ |
| सांगली | ३२.१ | २२.२ |
| सोलापूर | ३४.४ | २३.४ |
| वर्धा | ३५.१ | २४.४ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर. बुद्धि चातुर्याने कामे केल्यास आजचा दिवस चांगला सिद्ध होऊ शकेल.

**तुळ :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पश्चिम. धाडसाने विरोधकांचा पराभव करु शकाल. सामाजिक कौतुकाने आनंद होईल.

**वृषभ :** शुभ रंग: निळा, अनुकूल दिशा : उत्तर. वाद-विवाद आणि भांडणांनी मानसिक त्रास वाढेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर. सामाजिक कार्यात आपला सहभाग राहील. महत्वाची कामे पूर्ण करु शकाल.

**मिथुन :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर. जवळच्या व्यक्तींकडून उपयोगी सल्ला मिळेल. कामासाठी दिवस चांगला राहील.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम. वेळेवर कामे न झाल्यामुळे चिंता वाढेल. खर्च अधिक होईल.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा: पश्चिम. आर्थिक लाभ झाल्याने आनंद होईल. नोकरीत बढती मिळण्याचे योग येतील.

**मकर :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण. जुनी समस्या दूर होण्याची शक्यता आहे. दृढ निश्चय असल्या कारणाने प्रत्येक क्षेत्रात यश मिळेल.


**सिंह :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा : पश्चिम. कुंटूबासमवेत वेळ मनोरंजनात जाईल. व्यापारात नवीन संबंध जुळून येतील, जे भविष्यात फायदेशीर ठरतील.

**कुंभ :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर. कौटूंबिक तसेच संपत्ती संबंधातील अडचणींचे समाधान शक्य आहे. मिळकतीत वाढ होईल.

**कन्या :** शुभ रंग: पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण. आपल्या प्रयत्नांनी घरगूती समस्या सुटतील. आर्थिक स्थिती उत्साहवर्धक राहील.

**मीन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : उत्तर. सज्जन माणसांचा सहवास लाभेल. अभ्यासात मन रमेल. समाजात मान प्रतिष्ठा तसेच लोप्रियता मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०६२



### आडवे शब्द

१. मर्यादा, सीमा
४. प्रेम, माया
६. फुरसतीप्रमाणे
१०. हिंदीतील रहस्य
११. ललाट
१२. वस्ती
१४. हिंदी सिनेमांमुळे प्रसिद्ध पंजाबी कालवण, सरसोंका --
१६. कवि वि.वा. शिरवाडकर यांच्या धाकट्या भगिनीचे नाव
१८. आशीर्वाद
२०. नवसाने झालेला
२२. निकृष्ट दर्जाचा
२३. लवकर
२४. शैली, लकब
२५. नव्यानेच आलेला
२७. नुसत्या भिंती बांधून उभे न राहणारे
२८. बरोबरी
३०. आवड
३२. ओले गवत
३३. खेडे, शहर
३४. अग्रलेख
३६. झाडाला आलेली नवीन पाने
३८. पुन्हा पुन्हा
३९. मोठा जाड अंगरखा
४०. उद्यानंतरचा दिवस
४१. सक्षम
४२. अत्यंत दुष्ट
४४. औषध (हिंदी)
४५. युवक
४७. प्रथमपुरुषी एकवचनी सर्वनाम
४८. अंगावरील बारीक केस
५०. मवाळ धोरण
५१. महासर्प
५३. नमुना
५५. विंचवाचा संरक्षक अवयव
५६. किंमत
५७. चौथा हिस्सा
५८. निकट
६०. बाग
६२. मृत्युचा राजा
६४. पौराणिक वाहन
६६. राष्ट्रगीताची सुरुवात
७१. बांगला चलन
७३. फणधारी सर्प
७४. न थांबता
७६. नावाडी
७७. वेळ घालविणे
७९. तोफगाडी
८०. बाई, स्त्री
८१. थडगे

### उभे शब्द

१. काचेला आरसा बनविणारा
२. युवराज
३. ठराविक पैसे
४. कपाळभर लावलेले कुंकू
५. खिडकीची काच
६. च्या बरोबर
७. जमीनदार
८. तोटा
९. पृथ्वी
१३. लहान
१५. तृण
१७. परमेश्वर
१९. दागदागिने
२१. लहान मुलांचे चावणे
२२. घोटीव, कातीव
२३. पंख
२६. फणसाचा खाद्यभाग
२८. नवऱ्याची दुसरी पत्नी
२९. शिल्लक येणे
३१. रपाटून
३३. हवेतील थंडावा
३४. बचाव, रक्षण
३५. योग्य, उचित
३७. उदर
३८. अनुमती
३९. नाजूक
४०. अधिकाराचे स्थान, गीत
४१. कमळ
४३. सुकुमार
४५. तमाशातील कलावंत
४६. सूर्य, कापूस
४९. राबता, गर्दी
५१. इंद्रिय
५२. कळपातील प्रमुख हत्ती
५३. सासू झालेल्या आत्याबाई
५४. शरम
५५. हल
५९. व्रत
६१. वात्रट
६३. खानेसुमारी
६५. कंप, लटलट
६७. वर्तमानपत्रातील कप्पा
६९. हेतू
७०. कॉम्प्युटर मराठीत
७२. प्रश्न
७३. महिला
७५. पदार्थाचा सूक्ष्म भाग
७७. कावळा
७८. शंकर

### जम्बो शब्दकोडे क्र. १०६१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.धिटाई ३.सोदाहरण ६.पाहणी ८.कर्ज ९.धडका १०.जड ११.थर १२.डगर १४.वजीर १५.नकलकार १७.वजा १९.खाणे २०.जन्मभर २१.जरतर २२.शोक २४.मानिनि २५.वत्सलता २७.कोबी २९.नाक ३१.रव ३२.रीत ३४.समाधानी ३५.थरथर ३६.मखर ३७.पखाल ३८.यक्ष ४०.रचना ४२.बेकरी ४३.यदा ४४.दम ४६.राज ४७.क्षमा ४९.तयार ५०.रामराम ५१.पाककला ५२.मकर ५४.रवळी ५५.कुचकट ५८.शिक्षा ५९.वट ६१.लट ६२.कारभार ६६.कनक ६९.सरशी ७०.कावराबावरा ७१.सवालजबाब ७४.माता ७५.ताळ ७६.कळस

उभे उत्तर : १.धिप्पड २.ईथर ३.सोकावणे ४.हजरजबाबी ५.रड ६.लवकर ७.हलका ८.करवत १०अ.सुकर १३.गणेशोत्सव १५.नभ १६.रजनीनाथ १८.जारणमारण २३.कल २४.माननीय २५.वरवर २६.तारीख २८.हिमालय ३०.करवंद ३३.तरबेज ३४.सखा ३६.मना ३७.परीक्षक ३९.क्षमायाचक ४१.चकमक ४५.मस्तक ४६.रामरक्षा ४८.माकड ५१.पाळीव ५३.रसरशीत ५५.कुट ५६.टका ५७.अवकाश ५८.शिवराळ ६०.टक ६१.लकवा ६३.रस ६४.भार ६५.सावळा ६७.नसता ६८.काजळ ७२.लता ७३.बक

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### औद्योगिक वसाहत / इंदिरानगर नागरिक हक्क बचाव कृती समितीतर्फे बैठक संपन्न

**पुणे : दैनिक संध्या**

425/26/27 औद्योगिक वसाहत गुलटेकडी पुणे येथे SRA झोपडपट्टी पुनर्वसन काम चालू आहे SrA संबंधित अधीकारी यांच्याशी वारंवार प्रत्यक्ष भेट घेऊन पत्र व्यवहार करण्यात आला कृती समितीच्या वतीने वस्ती मधील नागरिकांच्या अडचणी व तक्रार बऱ्यापैकी सोडविण्यात समितीला यश आलेले आहे आज वस्तीतील स्थानिक प्रमुख पदाधिकारी व नागरिक व महिला मंडळ यांच्या वतीने झोपडी धारकांना आव्हान करण्यात आले खोट्या अफ़वाना बळी पडू नये, खोट्या प्रचाराला बळी पडू नये भविष्यातील चांगले घर प्रत्येक झोपडी धारकांना चांगले पक्के नवीन घरासाठी राहणीमान उंचावण्यासाठी सर्वांनी फॉर्म भरावे, यावेळी कृती समितीच्या वतीने मा नगरसेवक श्रीकांत पुजारी, सामाजिक कार्यकर्ता गणेश शेरला, बाळासाहेब अटल, लखण वाघमारे, बाळासाहेब शेलार, ललित तिंडे, मोहल्ला कमिटीच्या अनुसया गायकवाड, अँड अनिल इंगळे, सरूबाई कांबळे, कस्तुरा सुतार, अश्विनी राऊत, वैशाली कोटकर, सुर्या शेख, युसुफ मोमीन, रजीय्या कोझी, ईरशाद मोमिनी, गुंडप्पा पठणशेट्टी, सलिम सय्यद, अमृत बबलादी, इमरान मोमीन, नितीन भालेराव, रूपेश सरोदे, बालाजी शेरला आदि यावेळी उपस्थित होते.



### स.प. महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागात दोन दिवसीय राष्ट्रीय व्याख्यान

**पुणे : दैनिक संध्या**

सर परशुरामभाऊ महाविदयालयातील रसायनशास्त्र विभाग व इंगळे परिवार यांच्या संयुक्त विद्यमानाने डॉ. टी.आर. इंगळे यांच्या स्मरणार्थ दि. ८ व ९ सप्टेंबर २०२६ रोजी रसायनशास्त्र विषयातील संशोधनपर व्याख्यान व पोस्टर सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व महाविद्यालयातील रसायनशास्त्र विषयातील संशोधक, पदवी/पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील, विज्ञान शाखा उपप्राचार्या डॉ. सुनीता जाधव, रसायनशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. वंदना आरबाळे-तोरणे, समन्वयक डॉ. दिनेश गरुड व डॉ. प्रणव चंद्रचूड यांनी केले आहे. कै. टी. आर. इंगळे यांच्या कुटुंबीयांकडून दरवर्षी व्याख्यान व पोस्टर सादरीकरण स्पर्धेतील संशोधक विद्यार्थी गट व पदव्युत्तर विद्यार्थी गटात प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या स्पर्धकांना एकूण रोख रक्कम ५० हजार रुपयांचे बक्षीस वितरण होणार आहे. रोख रक्कम व सन्मानपत्र स्वरुपात बक्षीसे दिली जातात. स्पर्धेकरिता प्रवेश विनामूल्य असून इंगळे परिवाराकडून कै. टी. आर. इंगळे यांचे चिरंजीव मुकुंद व जयंत इंगळे (अमेरिका) यांनी सर्व विद्यार्थ्यांना उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले. कै. डॉ. टी.आर इंगळे हे सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व प्राध्यापक म्हणून संलग्न होते. त्यांना संशोधनाची खूप आवड होती. त्यांनी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर अनेक संशोधनपर शोध निबंध प्रसिद्ध केले आहेत. त्यांच्या या संशोधन वृत्तीमुळे त्यांना राष्ट्रीय प्रयोगशाळा पुणे व परडिऊ विद्यापीठ, अमेरिका येथे प्राध्यापक व शास्त्रज्ञ म्हणून काम करण्याची संधी मिळाली. सन २०२६ हे त्यांच्या पुण्यतिथीचे ३१ वे वर्ष असून त्यांच्या संशोधनातील योगदानाची आठवण म्हणून या वर्षी 'केमिस्ट्री : शेपिंग ए बेटर टुमारो' (Chemistry: Shaping a better tomorrow) या मुख्य विषयावर रसायनशास्त्र विभागाकडून लेक्चर व पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेबद्दलच्या अधिक माहितीसाठी www.spcollegepune.ac.in. या संकेतस्थळवर भेट देण्याचे अवाहन आयोजकाकडून करण्यात आले आहे.

# दशावताराच्या रंगात रंगले पुणेकर

**कलाकारांनी जिंकली मने; पुणे दहीहंडी महोत्सवात कोकणच्या आठशे वर्षांच्या लोकपरंपरेचा जागर; गृहराज्यमंत्र्यांकडून कौतुक**

■ पुणे (दै. संध्या)

पौराणिक कथानक, पारंपरिक वेशभूषा, रंगभूषा, प्रभावी संवादफेक, संगीत आणि दमदार अभिनय अशा विविध पैलूंनी सजलेल्या दशावताराने पुणेकरांचे लक्ष वेधून घेतले. कलाकारांनी आपल्या उत्स्फूर्त अभिनयातून पौराणिक व्यक्तिरेखा आणि प्रसंग जिवंत केले. पारंपरिक लोककलेचा हा आविष्कार पाहताना नाट्यरसिकांना कोकणच्या सांस्कृतिक मातीशी जोडले जाण्याचा अनुभव मिळाला. या सादरीकरणाला पुणेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांच्या अभिनयाला टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.




आनंदनाथ ट्रस्ट आणि राष्ट्रप्रथम ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित महोत्सवात कोकणातील तब्बल आठशे वर्षांची परंपरा लाभलेल्या दशावतार लोकनाट्याचे पुण्यात प्रथमच सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम, अभिनेत्री तथा बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत, शिवसेनेचे उपनेते इरफानभाई सय्यद, पुणे दहीहंडी महोत्सवाचे अध्यक्ष व महोत्सवाचे संयोजक वैभव वाघ, उपाध्यक्ष अथर्व पिसाळ, आनंदनाथ ट्रस्टचे विश्वस्त अनिल बटाणे आदी उपस्थित होते. योगेश कदम यांनी या अनोख्या दहीहंडी महोत्सवाचे कौतुक केले.

योगेश कदम म्हणाले, "दहीहंडीच्या जल्लोषाला कोकणच्या समृद्ध लोककलेची जोड मिळाल्याने पुणे दहीहंडी महोत्सवाला यंदा वेगळेच सांस्कृतिक रूप लाभले. दशावतार ही केवळ मनोरंजनाची कला नसून, कोकणच्या लोकजीवनाशी आणि श्रद्धा-परंपरांशी जोडलेली सांस्कृतिक ओळख आहे. अनेक पिढ्यांनी जपलेली ही कला पुण्याच्या व्यासपीठावर सादर झाल्याने तिच्या संवर्धनाच्या दृष्टीनेही या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित झाले. अशा स्वरूपाचे सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात पुणे शहराने नेहमीच पुढाकार घेतला आहे."

नीलम शिर्के सामंत म्हणाल्या, "दहीहंडी म्हटले की गोविंदा पथके, मानवी मनोरे आणि जल्लोषाचे वातावरण हे चित्र डोळ्यांसमोर येते. मात्र, या उत्सवाला लोककलेची जोड देत आयोजकांनी 'दहीहंडीच्या जल्लोषात सांस्कृतिक जागर' घडवून आणला. कोकणातील आठशे वर्षांची परंपरा असलेला दशावतार प्रथमच पुण्यात सादर करून लोककला आणि आधुनिक उत्सव यांचा सुंदर संगम साधण्यात आला.

लोककलांना मोठ्या व्यासपीठावर स्थान मिळाल्यास नव्या पिढीला आपल्या सांस्कृतिक वारशाची ओळख होण्यास मदत होते. त्यातून पारंपरिक कलांना नवे रसिक मिळतात आणि कलाकारांनाही प्रोत्साहन मिळते. याच भावनेतून पुणे दहीहंडी महोत्सवात दशावताराचा समावेश करण्यात आला. कोकणची आठशे वर्षांची परंपरा पुणेकरांच्या साक्षीने नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न ठरला, असे वैभव वाघ यांनी प्रास्ताविकात सांगितले.

## क्रेडाई-महाराष्ट्र आणि प्रॅक्टिकल एज्यु स्किल यांच्यात सामंजस्य करार

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या अधिक सक्षम संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून क्रेडाई( दी कॉन्फडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया)महाराष्ट्र आणि प्रॅक्टिकल एज्यु स्किल (PES) यांच्यात सामंजस्य करार (MOU) करण्यात आला.

पुण्यात आयोजित 'महा संवाद' या CREDAI महाराष्ट्राच्या विशेष कार्यक्रमात या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.यावेळी प्रॅक्टिकल एज्यु स्किल चे अध्यक्ष सन्मित शाह, क्रेडाई चे राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मगर, क्रेडाई चे अध्यक्ष प्रफुल तावरे आणि मानद सचिव श्री. आशिष पोखरणा यांची प्रमुख उपस्थिती होती.




या भागीदारीच्या माध्यमातून उद्योग-शिक्षण क्षेत्रातील दरी कमी करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगविश्वाच्या गरजांशी जोडण्यावर भर देण्यात येणार आहे. कौशल्य विकास, इंटर्नशिप, रोजगार क्षमता वाढविणे आणि प्रत्यक्ष उद्योग अनुभव यां सारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना 'उद्योगासाठी तयार' करण्याच्या दिशेने विविध कार्यक्रम राबविण्यात येतील अशी माहिती सन्मित शाह यांनी दिली.

शैक्षणिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष कामाचा अनुभव, आवश्यक कौशल्ये आणि क्रेडाई उद्योगाच्या अपेक्षांची जाणीव विद्यार्थ्यांना मिळावी, हा या सहकार्याचा प्रमुख उद्देश आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातील युवकांना भविष्यातील रोजगाराच्या संधींसाठी अधिक सक्षम बनविण्यास तसेच उद्योगाच्या गरजा आणि शिक्षण व्यवस्था यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण करण्यास मदत होणार आहे.

ही भागीदारी महाराष्ट्रातील शिक्षण आणि उद्योग क्षेत्रामधील सहकार्याला नवी दिशा देणारी असून, कौशल्यसंपन्न, आत्मविश्वासपूर्ण आणि रोजगारक्षम युवा घडविण्याच्या व्यापक उद्दिष्टाला बळ देणारी ठरेल.



## दहीहंडी केवळ उत्सव नाही, तर संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत नेणारा वारसा : पूजा सावंत

■ पुणे (दै. संध्या)

श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त हर्षवर्धन फाउंडेशन व एकता मित्र मंडळाच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या दहीहंडी उत्सवाला अभिनेत्री पूजा सावंत, ईशा केसकर, प्राजक्ता गायकवाड, प्रीती सोनी, अभिनेता अक्षय टंकसाळे, नृत्यांगना शिवकन्या तोडकर, अध्यक्ष आकाश चव्हाण तसेच गोल्डन बॉईजचे सनी वाघचौरे आणि संजय गुजर उर्फ बंटी यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित कलाकारांनी दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातून जपल्या जाणाऱ्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे कौतुक केले.

अभिनेत्री पूजा सावंत म्हणाल्या, "दहीहंडी उत्सव माझ्या मनाच्या खूप जवळचा आहे. अशा सांस्कृतिक उत्सवांमुळे आपली परंपरा आणि संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचते. त्यामुळे असे उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे होणे आणि ही परंपरा कायम टिकवणे अत्यंत गरजेचे आहे." अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड म्हणाल्या, "दहीहंडीचा उत्साह आणि त्यामागची एकजुटीची भावना खूप सुंदर आहे. अशा उत्सवांमधून महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचे दर्शन घडते."

अभिनेत्री ईशा केसकर म्हणाल्या, "दहीहंडी म्हणजे केवळ उत्सव नाही, तर एकत्र येण्याचा आणि आनंद साजरा करण्याचा सुंदर क्षण आहे. हर्षवर्धन फाउंडेशनने आयोजित केलेला हा सोहळा कौतुकास्पद आहे."

अभिनेता अक्षय टंकसाळे म्हणाले, "दहीहंडीच्या माध्यमातून तरुणाईमध्ये संघभावना, उत्साह आणि एकजूट निर्माण होते. अशा भव्य आयोजनाचा भाग होता आल्याचा आनंद आहे."

आयोजक स्नेहल सनी निम्हण म्हणाल्या, "श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडीची परंपरा जपण्याच्या उद्देशाने या उत्सवाचे आयोजन केले. नागरिक आणि कलाकारांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आमचा उत्साह आणखी वाढला आहे."

# डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्राने पटकावले 'क्यूएस आय-गेज' शैक्षणिक मूल्यांकन प्रणालीत 'प्लॅटिनम' मानांकन

■ पुणे (दै. संध्या)

डॉ: डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे यांनी वैद्यकशास्त्र (मेडिसिन) शाखेत 'क्यूएस आय-गेज' शैक्षणिक मूल्यांकन प्रणालीत 'प्लॅटिनम' मानांकन प्राप्त झाले आहे. वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि आरोग्यसेवेतील उत्कृष्टतेच्या दिशेने संस्थेच्या सातत्यपूर्ण वाटचालीतील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ) यांना ही 'प्लॅटिनम' मानांकन प्राप्त झाले आहे. उच्च शिक्षणाच्या विविध महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये गुणवत्ता आणि उत्कृष्टतेप्रती संस्थेची असलेली एकूण बांधिलकी यामधून अधोरेखित होते.

'क्यूएस आय-गेज' (QS I-GAUGE) हे एक स्वतंत्र मूल्यांकन व्यासपीठ असून, त्याद्वारे अध्यापन व अध्ययन, प्राध्यापकांची गुणवत्ता, रोजगारक्षमता, संशोधन व नवोन्मेष, पायाभूत सुविधा, प्रशासन, समावेशकता आणि सामाजिक उत्तरदायित्व यांसह विविध महत्त्वपूर्ण निकषांच्या आधारे संस्थांचे मूल्यांकन केले जाते.

वैद्यकशास्त्र (मेडिसिन) विषयातील 'प्लॅटिनम' मानांकन हे डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्राने वैद्यकीय शिक्षण, प्रायोगिक वैद्यकीय शिक्षण, संशोधन क्षमता आणि शैक्षणिक पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल आहे. शैक्षणिक काटेकोरपणासोबतच प्रत्यक्ष रुग्ण-उपचार अनुभव आणि आरोग्यसेवेप्रती दृढ बांधिलकी यांचा समन्वय साधणारे वातावरण निर्माण करण्यावर संस्थेचा असलेला भरही या मानांकनातून प्रतिबिंबित होतो.

डॉ. सौ. भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे, म्हणाल्या, "वैद्यकशास्त्र विषयातील 'क्यूएस आय-गेज' QS I-GAUGE 'प्लॅटिनम' मानांकन हे वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि आरोग्यसेवेतील उत्कृष्टतेप्रती असलेल्या आमच्या बांधिलकीचा अभिमानास्पद गौरव आहे. आमचे प्राध्यापक, विद्यार्थी आणि आरोग्यसेवा व्यावसायिक यांच्या सामूहिक प्रयत्नांची ही दखल आहे आणि भविष्यात आणखी उच्च मानदंड प्रस्थापित करण्यासाठी आम्हाला प्रेरणा देणारी आहे."

डॉ. यशराज पाटील, विश्वस्त व खजिनदार, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे, म्हणाले, "हे प्लॅटिनम रेटिंग शैक्षणिक उत्कृष्टता, संशोधन, नवोन्मेष आणि प्रायोगिक वैद्यकीय शिक्षणावर आमच्या सातत्यपूर्ण लक्ष केंद्रित करण्याचे प्रतिबिंब आहे. संपूर्ण डीपीयु परिवाराच्या सामूहिक प्रयत्नांची ही दखल असून, समाजाच्या बदलत्या गरजांसाठी भविष्यातील आरोग्यसेवा व्यावसायिकांना तयार करण्याच्या आमच्या निर्धाराला यामुळे आणखी बळ मिळते."

या गौरवाबाबत बोलताना डॉ. रेखा आर्कोट, अधिष्ठाता, डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे, म्हणाल्या, "QS I-GAUGE प्लॅटिनम रेटिंग हे वैद्यकीय शिक्षण, क्लिनिकल प्रशिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रात आम्ही सातत्याने करत असलेल्या प्रयत्नांची महत्त्वपूर्ण दखल आहे. हे मानांकन आम्हाला शैक्षणिक काटेकोरपणा, नवोन्मेष आणि अर्थपूर्ण प्रायोगिक वैद्यकीय शिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी तसेच सक्षम आणि संवेदनशील आरोग्यसेवा व्यावसायिक घडविण्यासाठी प्रेरणा देते."




ही उल्लेखनीय कामगिरी मा. डॉ. पी. डी. पाटील, मा. डॉ. (सौ) भाग्यश्री पी. पाटील आणि मा. डॉ. यशराज पी. पाटील यांच्या दूरदृष्टी आणि नेतृत्वाला समर्पित आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे संस्थेच्या शैक्षणिक, संशोधन आणि आरोग्यसेवा क्षेत्रातील वाढ आणि विकासाला महत्त्वपूर्ण पाठबळ मिळाले आहे.

वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत असताना, संस्था आपल्या शैक्षणिक आणि संशोधन परिसंस्थेला अधिक सक्षम करण्यावर, नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्यावर आणि विद्यार्थ्यांना अर्थपूर्ण क्लिनिकल शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर सातत्याने भर देत आहे. हे मानांकन आरोग्यसेवा शिक्षणाला पुढे नेण्याच्या तसेच समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देण्याच्या संस्थेच्या बांधिलकीला आणखी बळकटी देते.

डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र भविष्यातही शैक्षणिक काटेकोरपणा, संशोधनाधारित शिक्षण, प्रायोगिक वैद्यकीय शिक्षण, नवोन्मेष आणि सामाजिक उत्तरदायित्वाची दृढ भावना यांच्या माध्यमातून उत्कृष्टतेचा पाठपुरावा करत राहील. भविष्यातील सक्षम आणि संवेदनशील आरोग्यसेवा व्यावसायिक घडविणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## महापारेषणच्या चिंचवड अतिउच्चदाब वीज उपकेंद्रात आग

पुणे : दैनिक संध्या

■ महापारेषणच्या यंत्रणेतील बिघाडाचा महावितरणच्या वीजपुरवठ्यावर परिणाम

■ बहुतांश भागाचा वीजपुरवठा पूर्ववत

महापारेषण कंपनीच्या चिंचवड येथील २२० केव्ही अतिउच्चदाब वीज उपकेंद्रात रविवारी (दि. ६) दुपारी सुमारे १२.२५ वाजता तांत्रिक बिघाड होऊन आग लागली. आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले असून, या बिघाडाचा परिणाम महावितरणच्या वीजपुरवठ्यावर झाला. महावितरणने उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करून बहुतांश प्रभावित भागाचा वीजपुरवठा दुपारी ३ वाजेपर्यंत पूर्ववत करण्यात यश मिळविले. चिंचवड उपकेंद्रातील २२ केव्ही सीटी व ब्रेकरमध्ये स्फोट होऊन आग लागल्याने महावितरणला वीजपुरवठा करणाऱ्या उच्चदाब वाहिन्यांवर परिणाम झाला. परिणामी पिंपरी-चिंचवड शहरातील प्राधिकरण, रावेत, काळेवाडी, वाकड, पिंपळे गुरव, पिंपळे निलख, सांगवी, पुनावळे, ताथवडे आदी भागांतील वीजपुरवठ्यावर परिणाम झाला. तसेच शिवाजीनगर, औंध व गणेशखिंड भागातील वीजपुरवठाही काही काळ खंडित झाला. महापारेषणकडून बिघाड झालेला भाग बंद ठेवून उर्वरित यंत्रणा पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. तर दुसरीकडे, महावितरणकडून उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करून प्रभावित भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात आली. त्यामुळे बहुतांश भागातील वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात यश मिळाले. चिंचवड अतिउच्चदाब वीज उपकेंद्रातून निघणाऱ्या रहाटणी व गणेशखिंड १३२ केव्ही वाहिनीवर परिणाम झाल्याने शिवाजीनगर, औंध, गणेशखिंड, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर गावठाण, मॉडेल कॉलनी, बालगंधर्व आदी भागांतील वीजपुरवठाही काही काळ खंडित झाला होता. दुपारी १२.२५ वाजता खंडित झालेला या भागातील वीजपुरवठा सुमारे १.५० वाजता पूर्ववत करण्यात आला. गणेशखिंड अतिउच्चदाब वीज उपकेंद्रातून पुणे मेट्रोलाही वीजपुरवठा होतो. या वीजपुरवठ्यावरही काही काळ परिणाम झाला होता.

## श्री एकवीरा विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा!

पुणे : दैनिक संध्या

चारकोप येथील श्री एकवीरा विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा सदस्य तथा शिक्षणतज्ज्ञ महेंद्र गणपुले यांनी यावेळी शिक्षकांना राज्य अभ्यासक्रम आराखडा, मूल्यमापनाच्या पद्धती आणि बदलत्या अध्यापन तंत्रांविषयी मार्गदर्शन केले. नवीन अभ्यासक्रमाचे स्वरूप, मूल्यांकन व मूल्यमापनाच्या विविध पद्धती, आधुनिक अध्यापन तंत्रे तसेच बदलत्या काळानुसार शिक्षकाची भूमिका यावर गणपुले यांनी सविस्तर भाष्य केले. विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाबरोबरच त्यांच्या वैयक्तिक क्षमता ओळखून त्यानुसार अध्यापन करण्यावर नव्या अभ्यासक्रमात भर देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पूर्वप्राथमिक शिक्षणासह ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षणातील तफावतही त्यांनी अधोरेखित केली. "शिक्षकाची भूमिका केवळ शिकविणाऱ्याची नसून सुलभकाची असली पाहिजे," असे सांगत गणपुले यांनी शिक्षक स्वतः एक महत्त्वाचे शैक्षणिक साधन असल्याचे स्पष्ट केले. प्रभावी मूल्यमापनासाठी प्रश्नांचा आराखडा कसा असावा, मूल्यमापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे अचूक आकलन कसे करता येईल, याची उदाहरणांसह माहिती त्यांनी दिली. आज विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात माहिती मिळवत आहे.

# शेतकरीहितासाठी आधुनिक तंत्रज्ञान व मूल्यवर्धित उत्पादनांवर भर द्यावा

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार : सोमेश्वर सहकारी साखर कारखाना येथे शेतकरी मेळावा

■ पुणे (दै. संध्या)




शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, उत्पादन खर्चात बचत आणि शेतीचे अर्थकारण मजबूत करण्यावर भर देणे आवश्यक आहे. बदलत्या हवामान परिस्थिती आणि वाढत्या उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर कृषी व साखर क्षेत्राने आधुनिक तंत्रज्ञान, मूल्यवर्धित उत्पादन आणि अचूक नियोजनाचा स्वीकार करून शेतकरीहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

सोमेश्वर सहकारी साखर कारखाना सोमेश्वरनगर येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात त्या बोलत होत्या. यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील, आमदार सचिन पाटील, माजी आमदार संभाजी कुंजिर, पीडीसीसी बँक, पुणेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप, उपाध्यक्ष किसन तांबे, माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक राजवर्धन शिंदे आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या की, शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. शेतकरी सक्षम झाला तर गावाची आणि पर्यायाने राज्याची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल. त्यामुळे शासन, शेतकरी, सहकारी संस्था आणि साखर उद्योगाने परस्पर समन्वयाने काम करून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. स्वर्गीय दादा हे स्वतः शेतकरी असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या अडचणी आणि गरजांची जवळून जाण होती. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला. कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक सिंचन पद्धती, यांत्रिकीकरण, माती परीक्षण, सुधारित वाणांची निवड आणि अचूक पीक नियोजन यांचा वापर वाढविल्यास उत्पादनक्षमता वाढवून उत्पादन खर्च कमी करता येईल.

साखर उद्योग हा महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा आहे.

अतिवृष्टी, दुष्काळ, हवामानातील अनिश्चितता, वाढता उत्पादन खर्च आणि साखरेच्या बाजारपेठेतील चढ-उतार यांसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी साखर कारखान्यांनी केवळ साखर उत्पादनावर अवलंबून न राहता इथेनॉल, बायोगॅस, सीएनजी, सेंद्रिय खत आणि इतर मूल्यवर्धित उत्पादनांकडे लक्ष द्यावे, असे उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने आर्थिक शिस्त, कार्यक्षम व्यवस्थापन आणि शेतकरीहिताला प्राधान्य देत सहकार क्षेत्रात विश्वासार्हता निर्माण केली आहे.

कारखान्याच्या प्रगतीमध्ये सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, अधिकारी आणि व्यवस्थापनाचे योगदान महत्त्वाचे आहे. आगामी काळातही शेतकरी सभासदांना अधिकाधिक लाभ मिळेल, यासाठी कारखान्याने दीर्घकालीन नियोजन करावे. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाची परंपरा कायम ठेवत परिसराच्या सर्वांगीण विकासासाठीही सहकारी संस्थांनी योगदान द्यावे, असे उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी सांगितले.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांनी सोमेश्वर कारखान्याच्या प्रगतीचे कौतुक करून शेतकरी, सभासद, कामगार आणि व्यवस्थापनाच्या योगदानातून संस्थेने उल्लेखनीय प्रगती साधल्याचे सांगितले.

कारखान्याची आर्थिक बळकटी, कार्यक्षमता आणि विश्वासार्हता कायम ठेवत भविष्यातील विकासासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

आमदार सचिन पाटील यांनीही कारखान्याच्या कार्यक्षम व्यवस्थापनाचे, आर्थिक शिस्तीचे आणि शेतकरीहिताच्या कामकाजाचे कौतुक केले. सोमेश्वर साखर कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी प्रस्तावना करताना कारखान्याच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची आणि साधलेल्या कामगिरीची माहिती दिली. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भरती परीक्षा पद्धतीच्या सर्वंकष अभ्यासासाठी पुण्यात १२ सप्टेंबरला सल्लामसलत

■ पुणे (दै. संध्या)

राज्यातील भरती परीक्षा पद्धतीच्या विविध बाबींचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीच्या माध्यमातून विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्था, परीक्षा यंत्रणा, विषयतज्ज्ञ तसेच संबंधित घटकांशी संवाद साधून त्यांच्या सूचना, मते व अनुभव जाणून घेण्यात येणार आहेत. या अनुषंगाने समितीची पुणे विभागीय सल्लामसलत १२ सप्टेंबर २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आली आहे. ही सल्लामसलत सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे. या चर्चेत विद्यार्थी व स्पर्धा परीक्षा उमेदवार, शैक्षणिक संस्था, परीक्षा प्रक्रियेशी संबंधित यंत्रणा, विषयतज्ज्ञ आणि अन्य संबंधित घटक सहभागी होऊ शकतील. भरती परीक्षा प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबतचे अनुभव, अपेक्षा आणि सुधारणा सूचना जाणून घेणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. पुणे महसूल विभागातील सल्लामसलत प्रक्रियेच्या समन्वयासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे स्वतंत्र समन्वय कक्ष कार्यान्वित करण्यात येणार आहे. विद्यार्थी, उमेदवार, संस्था, तज्ज्ञ आणि अन्य संबंधित घटकांना आपल्या सूचना व अभिप्राय गुरुवार दिनांक ११ सप्टेंबर पर्यंत Pune-ExamReforms Taskforce@maharashtra.gov.in या ई - मेलवर पाठविता येतील.

## संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीचे दर्शन घेत बिट्टा यांचे गौरवोद्गार

■ आळंदी (दै. संध्या)

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीने पावन झालेल्या आळंदी नगरीत आल्यानंतर मला प्रसन्न वाटले. मंदिरातील अजानवृक्षाजवळ खूप मोठे चैतन्य आहे. एवढे मोठे चैतन्यमय समाधीस्थळ,आणि नामांकित ठिकाण असूनही अद्याप देशातील बहुतांश लोकांपर्यंत पोहोचले नाही, हे आश्चर्य म्हणावे लागेल. समाजातील सर्व स्तरांपर्यंत या संत महतीची माहिती पोहोचणे गरजेचे असल्याचे अखिल भारतीय आतंकवाद विरोधी मोर्चाचे अध्यक्ष, पंजाबस्थित मनिंदरजीतसिंग बिट्टा यांनी आज आळंदीत सांगितले. निमित्त होते संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीचे दर्शन आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या मंदिराचे दर्शन. अखिल भारतीय आतंकवाद विरोधी मोर्चाचे अध्यक्ष, भारतीय युवक काँग्रेसचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि पंजाबमधील बेअंतसिंग सरकारमध्ये मंत्री असलेले मनिंदरजीतसिंग बिट्टा हे दहशतमुक्त देश व्हावा यासाठी प्रार्थना करण्यासाठी आज आळंदीत आले होते. शनिवारी( ता. 5) सायंकाळी 6.15 वाजता नवी दिल्ली येथून विमानाने ते लोहगाव विमानतळाकडे निघाले.

साडेसहा वाजता लोहगाव विमानतळावर पोहोचल्यानंतर मोटारीने शासकीय विश्रामगृहात मुक्काम केला. आज रविवारी(ता. 6) पहाटे पाच वाजता ते आळंदीत पोहोचले. आळंदीत पोहोचल्यानंतर पहाटे माऊलींच्या संजीवन समाधीसमोर आरतीप्रसंगी ते पंखा मंडपात बसले. त्यानंतर पावणेसहाला दर्शन सुरू होणार असल्याने थोडा वेळ होता. त्यांनी मंदिर परिसराची माहिती जाणून घेतली. यावेळी आळंदी देवस्थानचे राजाभाऊ चोपदार यांनी देऊळवाड्यातील माऊलींचे समाधी मंदिर, गाभारा, अजानवृक्ष, सुवर्ण पिंपळ याबाबत विस्तृत माहिती सांगितली. अजानवृक्षाच्या माहितीने आणि दर्शनाने चैतन्य मिळाल्याचे त्यांनी सांगितले. तर सुवर्ण पिंपळाच्या प्रदक्षिणेचे महत्त्व ऐकल्यानंतर स्वतः आणि त्यांच्यासोबतच्या कर्मचाऱ्यांनी सुवर्ण पिंपळाला सात प्रदक्षिणा घातल्या आणि भक्तिभावाने माऊलींच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी आळंदी देवस्थानच्या वतीने राजाभाऊ चोपदार यांनी श्री. बिट्टा यांचा माऊलींची प्रतिमा देऊन सन्मान केला.

## विद्यार्थी एक दिवसाचे प्राचार्या, उपप्राचार्या आणि प्राध्यापक; शिक्षक दिनाचा अनोखा उपक्रम

■ पिंपरी (दै. संध्या)



शिक्षक दिनाचे औचित्य साधून चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज या महाविद्यालयात 'एक दिवस विद्यार्थ्यांचा' हा अनोखा उपक्रम उत्साहात राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी प्राचार्या, उपप्राचार्या आणि प्राध्यापकांची भूमिका पार पाडली. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर महाविद्यालयात हा उपक्रम घेण्यात आला. सकाळी संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडे पदभार सोपवण्यात आला. यामध्ये मुस्कान शेख हिने एक दिवसाची प्राचार्या, कु. जेसिका शर्मा हिने उपप्राचार्या, तर ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध विभागांचे प्राध्यापक म्हणून काम पाहिले. विद्यार्थी प्राध्यापकांनी वर्गावर जाऊन तासिका घेतल्या, प्रात्यक्षिके घेतली आणि विद्यार्थ्यांच्या शंका सोडवल्या. तर विद्यार्थी प्राचार्यांनी दिवसभर महाविद्यालयाचे प्रशासन, शिस्त आणि शैक्षणिक कामकाजाचे नियोजन पाहिले.

आपल्या मनोगतात विद्यार्थी प्राचार्या मुस्कान शेख म्हणाली, "एक दिवस जरी असले तरी प्राचार्य पदाची जबाबदारी किती मोठी आहे, हे आज समजले. प्राध्यापकांना वर्ग सांभाळताना किती मेहनत घ्यावी लागते, याची जाणीव झाली." यावेळी विद्यार्थी प्राध्यापकांनीही आपल्या भावना व्यक्त करत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, उपप्राचार्या डॉ. जयश्री मुळे, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, स्टाफ अकॅडमीच्या समन्वयिका डॉ. जयश्री कांबळे, प्रा. स्नेहल वऱ्हाडे यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन विद्यार्थी प्राध्यापकांचा खास सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी यांनी शिक्षकांचे महत्त्व विषद केले, तर मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी आपल्या कारकिर्दीतील अनुभव सांगून मार्गदर्शन करताना भविष्यात आदर्श शिक्षकी पेशा स्वीकारण्याचे आवाहन शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांना केले. तुमच्यात आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, विद्यार्थ्याप्रती आदर हे गुण असतील तर ते अंगीकारून शिक्षकी पेक्षा भविष्यात स्वीकारावा. कारण शिक्षक हा एक पिढी घडवत असतो. चांगल्या शिक्षकांची आजही खूप गरज आहे असे सांगुन नुकताच आदर्श शिक्षक म्हणून गौरविण्यात आलेले महाराष्ट्रातील डॉ. कविता गित्ते, सीमा शिंदे, कुंदा बच्छाव याची सखोल माहीती उपस्थितांना दिली. समारोप प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य व गणेश वंदना सादर केली.

# शिक्षण आणि उद्योगविश्वातील दिग्गज एका मंचावर

## 'महाराष्ट्र एज्युकेशन अँड कॉर्पोरेट अवॉर्ड्स'चा रंगला दिमाखदार सोहळा : उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि उद्योग-शैक्षणिक संस्थांमधील सक्रीय सहकार्यावर भर**

■ पुणे (दै. संध्या)



'शैक्षणिक क्षेत्राने उद्योगविश्वाचा सन्मान करावा आणि उद्योगविश्वाने शैक्षणिक क्षेत्राचा गौरव करावा' या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र एज्युकेशन अँड कॉर्पोरेट अवॉर्ड्स २०२६'च्या चौथ्या पर्वाचा शिक्षक दिनानिमित्त, ५ सप्टेंबर रोजी पुण्यातील सनीज वर्ल्ड येथे दिमाखदार समारोप झाला.

पुण्यातील मनुष्यबळ व प्रतिभा व्यवस्थापन क्षेत्रातील जॉबिझ्झा या संस्थेने, संस्थापक डॉ. गौरव शर्मा यांच्या पुढाकारातून या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. या सोहळ्यास शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि विविध क्षेत्रांतील ६०० हून अधिक मान्यवरांची उपस्थिती होती. शैक्षणिक आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील प्रत्येकी १५ अशा एकूण ३० मान्यवर नेत्यांचा त्यांच्या नेतृत्वगुणांसाठी, नावीन्यपूर्ण उपक्रमांसाठी आणि भविष्यासाठी सक्षम मनुष्यबळ घडविण्यातील योगदानाबद्दल गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला pass98 या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित मुलाखत-तयारी मंचाचे प्रमुख प्रायोजकत्व लाभले, तर यवतमाळ येथील जगदंबा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगनेही प्रायोजक म्हणून सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शिक्षण सर्वसमावेशक, गुणवत्तापूर्ण आणि सर्वसामान्यांना परवडणारे असण्याची गरज अधोरेखित केली. तसेच महिला सक्षमीकरण आणि उद्योग-शिक्षण क्षेत्रातील समन्वयावर त्यांनी विशेष भर दिला. ते म्हणाले, "महिलांना शिक्षण घेण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांची क्षमता केवळ घरापुरती मर्यादित राहता कामा नये. महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन आणि लवचिक रोजगाराच्या संधी निर्माण करणे आवश्यक आहे. रोजगाराच्या प्रत्यक्ष संधी निर्माण करण्यासाठी शैक्षणिक संस्था आणि उद्योगांनी हातात हात घालून काम केले पाहिजे. शिक्षण परवडणारे आणि गुणवत्तापूर्ण असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कमी खर्चात दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्था आणि महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष भरती करणारे उद्योगविश्व यांचा समन्वय झाला, तरच भारताच्या भविष्यातील क्षमता पूर्णपणे साकार होतील." यानंतर झालेल्या उच्चस्तरीय परिसंवादात शैक्षणिक अभ्यासक्रम आणि उद्योगांच्या अपेक्षा यांच्यातील दरी कमी करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी या चर्चेचे सूत्रसंचालन केले.

'महाराष्ट्र एज्युकेशन अँड कॉर्पोरेट अवॉर्ड्स'च्या स्थापनेमागील भूमिका स्पष्ट करताना जॉबिझ्झाचे संस्थापक आणि या पुरस्कारांचे संस्थापक डॉ. गौरव शर्मा म्हणाले, "उद्योगविश्व अनेकदा रोजगारासाठी तयार उमेदवार मिळत नसल्याची तक्रार करते, तर शैक्षणिक संस्था योग्य रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याचे सांगतात. ही दरी दूर करून परस्पर संवादाचे व्यासपीठ निर्माण करण्यासाठी आम्ही या उपक्रमाची सुरुवात केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत'च्या संकल्पनेशी सुसंगत वाटचाल करताना विकसित महाराष्ट्र हा भारताच्या विकासाचा प्रमुख इंजिन ठरेल. ५ सप्टेंबरला शिक्षक आणि उद्योगक्षेत्रातील मार्गदर्शकांचा गौरव करणे म्हणजे जागतिक दर्जाची, शाश्वत आणि सक्षम प्रतिभाव्यवस्था उभारण्याच्या आमच्या बांधिलकीचा पुनरुच्चार आहे."

पारंपरिक पद्धतीने केवळ पदव्या देण्यापेक्षा उद्योग आणि शैक्षणिक संस्थांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष उद्योगाभिमुख कौशल्यविकासाची साखळी निर्माण करण्याची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या सोहळ्यात कुलगुरू, अधिष्ठाता, संचालक आणि प्राचार्य यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी, संस्थापक, मनुष्यबळ विभागप्रमुख आणि वरिष्ठ व्यवस्थापनातील अधिकारी, अशा शैक्षणिक आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील एकूण ३० मान्यवरांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांमधील कौशल्याची दरी भरून काढण्यासाठी तसेच संस्थात्मक पातळीवर नावीन्यपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी योगदान देणाऱ्या या नेतृत्वाचा पुरस्काराद्वारे सन्मान करण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, "उद्योगक्षेत्राच्या सक्रीय सहभागाशिवाय अर्थपूर्ण प्रतिभाविकास आणि आवश्यक संसाधनांचा योग्य वापर शक्य नाही.

विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष जगातील कौशल्ये विकसित करण्यासाठी उद्योगविश्वाने पुढाकार घेत शैक्षणिक संस्थांसोबत सक्रियपणे काम केले पाहिजे."

सोमैया विद्याविहार विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एन. राजशेखरन पिल्लई यांनी शिक्षणव्यवस्थेतील शिक्षकांच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना सांगितले, "भारतीय उद्योगविश्वाने शिक्षण क्षेत्रासाठी केलेली सर्वांत महत्त्वाची गुंतवणूक म्हणजे आपल्या अध्यापन व्यवस्थेला बळकटी देणे. देशात सक्षम आणि आधुनिक कौशल्यांनी सुसज्ज शिक्षकांची मोठी गरज आहे. शिक्षकांना सक्षम करून त्यांच्यात गुंतवणूक केली, तर आपण भारताचे भविष्य आणि देशाची वाटचाल सुरक्षित करीत आहोत."

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पीसीएमसी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सोनवणे म्हणाले, "विद्यार्थी आणि रोजगार देणाऱ्या संस्था या दोघांसाठीही परस्पर फायदेशीर व्यवस्था निर्माण करण्यासाठी शैक्षणिक संस्था आणि उद्योगविश्वाने एकत्रितपणे पुढे जाणे आवश्यक आहे. आमच्या विद्यापीठाने अभ्यासक्रमाची आखणी आणि अध्यापन प्रक्रियेत उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञांचा थेट सहभाग ३० टक्क्यांपर्यंत नेला आहे. त्यामुळे आमचे विद्यार्थी पदवी प्राप्त करतानाच उद्योगाच्या गरजांनुसार आवश्यक कौशल्यांनी सज्ज होतात."

या नेतृत्वपर परिसंवादात जेएसपीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. बी. आहुजा, डीईएस पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजेश इंगळे, एनस्क्वेअर एक्सपर्ट्सचे मुख्य धोरण अधिकारी किरीट मांडवगणे आणि टाटा मोटर्स ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजय वाधवा यांनीही महत्त्वपूर्ण विचार मांडले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### हिंजवडीतील खड्डे, वाहतूक कोंडीविरोधात आंदोलन

**पिंपरी : दैनिक संध्या**

देशातील प्रमुख आयटी हब म्हणून ओळख असलेल्या हिंजवडी परिसरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था, वाढती वाहतूक कोंडी आणि रखडलेल्या पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर आज ग्रामस्थ, स्थानिक नागरिक तसेच आयटी क्षेत्रातील कर्मचारी रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहेत. या आंदोलनात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा युवासेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे सहभागी होणार असल्याने आंदोलनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हिंजवडीतील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून वाहनचालकांना रोजच जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यामुळे अनेक ठिकाणी खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. याचा सर्वाधिक फटका आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांना तसेच स्थानिक नागरिकांना बसत आहे. वाहतूक कोंडीची समस्याही दिवसेंदिवस गंभीर होत असून, कार्यालयीन वेळेत अनेक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागतात. त्यामुळे प्रवाशांचा वेळ आणि इंधनाचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. हिंजवडीसारख्या जागतिक दर्जाच्या आयटी पार्कमध्ये मूलभूत सुविधांची अशी अवस्था का, असा सवाल आंदोलकांनी उपस्थित केला आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनातून रस्त्यांची तातडीने दुरुस्ती, खड्डेमुक्त हिंजवडी आणि वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येत आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिक, आयटी कर्मचारी आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### आ. शंकर जगतापांची जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेवर नियुक्ती

**पिंपरी : दैनिक संध्या**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठान (DMF), पुणेच्या नियामक परिषदेवर पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे अधिकृत पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाच्या खनिकर्म शाखेने जारी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने ५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार तसेच ११ ऑक्टोबर २०२४च्या अधिसूचनेतील तरतुदींनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेवर खाणकामामुळे बाधित भाग आणि तेथील नागरिकांच्या विकासासाठी धोरण ठरविण्याची महत्त्वाची जबाबदारी असते. प्रतिष्ठानचा वार्षिक कृती आराखडा व अर्थसंकल्प मंजूर करणे, विकासकामांना मान्यता देणे, निधीचा योग्य आणि पारदर्शक वापर होत असल्याची खात्री करणे, कामांचा वेळोवेळी आढावा घेणे तसेच वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षित खात्यांना मंजुरी देणे, ही परिषदेची प्रमुख कामे आहेत. जिल्हा खनिज अधिकारी तथा सदस्य सचिव आनंद पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने हे नियुक्तिपत्र जारी केले आहे. “जिल्हा खनिज प्रतिष्ठान पुणेच्या नियामक परिषदेवर पदसिद्ध सदस्य म्हणून मिळालेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. खनिजबाधित भागातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी उपलब्ध निधीचा योग्य व पारदर्शक वापर व्हावा, यासाठी प्राधान्याने प्रयत्न करेन.” अशी प्रतिक्रिया आ. शंकर जगताप यांनी यावेळी दिली.

### देवकुळे भगिनी ‘राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**निगडी : दैनिक संध्या**

ग्लोबल इलाईट मीडियाच्या वतीने प्रा स्वाती देवकुळे आणि प्रा कविता देवकुळे या भगिनींचा नॅशनल टीचर पुरस्काराने सन्मान करण्यात आला. स्वाती देवकुळे या वाडिया कॉलेज येथे १६ वर्षांपासून प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. तर कविता देवकुळे या रत्नागिरी येथील अभ्यंकर कुलकर्णी ज्यू कॉलेज मध्ये २१ वर्षांपासून कार्यरत आहे. विशेष बाब म्हणजे निगडी येथील एका कुटुंबातील दोन्ही बहिणींना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेत राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. भौतिकशास्त्रातील सातत्यपूर्ण योगदानामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्यामुळे त्यांना हा बहुमान प्राप्त झाला आहे.

# निगडी-चाकण मेट्रोला पुन्हा ‘ब्रेक’

■ **पिंपरी (दै. संध्या)**

निगडी ते चाकण या मार्गाच्या सुधारित डीपीआरला मान्यता देण्यापूर्वी शहर सुधारणा समितीमध्ये नगरसेवकांनी दिलेल्या असंख्य उपसूचनांना मंजुरी देऊन, ते बदल मान्य केल्यानंतर कार्यवाही करावी, अशी उपसूचना सत्ताधारी भाजपने सर्वसाधारण सभेत मंजूर केली आहे. त्यामुळे डीपीआर मंजुरी मिळण्यासाठी महामेट्रो व्यवस्थापनाला आणखी दोन ते तीन महिने प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

निगडी ते चाकण या 47.295 किलोमीटर अंतराच्या 12 हजार 937 कोटी 23 लाख रुपये खर्चाच्या एलिव्हेटेड मेट्रो मार्गाच्या डीपीआरला उपसूचनेसह सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे. सभेत वन के अंतर्गत हा विषय दाखल करून घेण्यात आला. या प्रकल्पात पिंपरी-चिंचवडमध्ये 28 तर, एकूण 34 मेट्रो स्टेशन असतील. त्यात महापालिकेचा 330 कोटींचा हिस्सा तर, केंद्र आणि राज्य शासनाच्या प्रत्येकी 1 हजार 721 कोटी 71 लाख रुपयांचा हिस्सा असेल. हा सुधारित डीपीआर तयार करून महामेट्रोने पालिका आयुक्तांकडे 26 फेब्रुवारी 2026 ला सादर केला. त्यासंदर्भात नगरसेवकांसमोर दोनदा सादरीकरण करण्यात आले. सर्वसाधारण सभेत डीपीआरला अनेक नगरसेवकांनी उपसूचना दिल्या. आमच्या भागातून मेट्रो न्या. स्टेशनचे नाव बदला. दोन मेट्रो मार्ग एकमेकांना मिळतात त्या स्टेशनवर स्वतंत्रपणे ये-जा करण्यासाठी प्रवेशद्वार उभारा. पुणे ते आळंदी, निगडी ते गोडाऊन चौक अशी मेट्रो न्या, अशी मागणी नगरसेवकांनी केली आहे.

निगडी ते चाकण हा मेट्रो मार्ग ज्या ठिकाणी एकमेकांना जोडला जातो, तेथील स्टेशनवर ये-जा करण्यासाठी स्वतंत्र प्रवेशद्वाराची सोय करावी. विशालनगर कॉर्नर ते कोकणे चौक या स्टेशनदरम्यान, औंध-रावेत बीआरटी मार्गालगत अतिरिक्त स्टेशन उभारण्यात यावे. संत तुकारामनगर मेट्रो स्टेशनवरून वल्लभनगरचे स्टेशन



महेशनगर कॉर्नरकडे स्थलांतरित करून स्वप्ननगरी हाऊसिंग सोसायटी किंवा मगर स्टेडियम येथे बांधण्यात यावे, अशी उपसूचना सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी दिली. भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक ते गोडाऊन चौक या स्पाईन रस्त्यावर मेट्रो मार्गिका तयार करा, अशी उपसूचना नगरसेविका योगिता नागरगोजे यांनी दिली.

पिंपळे निलख येथील विशालनगर कॉर्नरऐवजी कस्पटे चौक मेट्रो स्टेशन असे नाव देण्यात यावे, अशी उपसूचना संदीप कस्पटे यांनी दिली. शहर सुधारणा समितीकडे सर्व उपसूचना तसेच, सूचना जमा केल्या जाणार आहेत. सूचना स्वीकारून तसे बदल करण्यास मान्यता मिळाल्यानंतरच सुधारित डीपीआरला मान्यता देण्याची कार्यवाही करावी, अशी उपसूचना सत्ताधाऱ्यांनी मंजूर केली.

त्यामुळे डीपीआरला पालिका सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळण्यासाठी महामेट्रो व्यवस्थापनाला २ ते ३ महिने प्रतीक्षा करावी लागणार आहे. भोसरी येथील उड्डाण पूल न पाडता निगडी ते चाकण मेट्रो मार्ग पूर्वीच्या डीपीआरनुसार गवळीमाथा ते गोडाऊन चौक या मार्गाने नेण्यात यावा. मार्गिका तयार करताना 61 मीटर जागेचा वापर करावा. मेट्रोचे काम सुरू करण्यापूर्वी डीपीतील मुख्य व अंतर्गत रस्ते विकसित करण्यात यावेत. आवश्यकतेनुसार जोड रस्ते, पर्यायी वाहतूक मार्ग व वाहतूक व्यवस्थापनाचे नियोजन करून, ते काम पूर्ण झाल्यानंतर मेट्रो मार्गिकेच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात यावी, अशी उपसूचना देण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला लागून असलेल्या आळंदी परिसराचा मोठा विकास होत आहे. तेथे लोकवस्ती वाढत असून, संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिर तीर्थक्षेत्रास लाखो भक्त नियमितपणे भेट देतात. सद्यस्थितीत या मार्गावर दररोज 700 ते 800 पीएमपीएल बसच्या फेऱ्या होत आहेत. त्यामुळे या मार्गावर मेट्रो या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची गरज असून, या मार्गावर मेट्रो सुरू करावी, अशी उपसूचना माजी महापौर नितीन काळजे, ज्ञानेश्वर जगताप आणि कुशाग्र कदम यांनी दिली आहे.

## दिलासा समूहाच्या वतीने शहरातील शिक्षकांचा सन्मान

■ **पिंपरी (दै. संध्या)**

दिलासा साहित्य सेवा संघ आणि ओम साई ट्रॅव्हल्सच्या वतीने पिंपरी - चिंचवड शहरातील आदर्श शिक्षकांचा सन्मान शिक्षक दिनाचे औचित्य साधून पुरंदर तालुक्यातील ऐतिहासिक पांडेश्वर मंदिराच्या प्रांगणात मानवी हक्क संरक्षण आणि जागृती संस्थेचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड यांच्या हस्ते शिक्षकांना 'हर हर महादेव' या जयघोषात शाल, श्रीफळ आणि ग्रंथ देऊन सन्मानाने करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक नारायण कुंभार होते.

याप्रसंगी दिलासा समूहाचे अध्यक्ष सुरेश कंक, ह. भ. प. अशोकमहाराज गोरे, कैलास भैरट, प्रकाश घोरपडे, विलास कुंभार, संगीता जोगदंड हे मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी योगिता कोठेकर (त्रिवेणीनगर), शामला पंडित दीक्षित (रावेत), अंबादास रोडे (थेरगाव), सुभाष चटणे (चिंचवडगाव), तानाजी एकोंडे (काळेवाडी), भाऊसाहेब गायकवाड (त्रिवेणीनगर), बाळकृष्ण अमृतकर (रहाटणी), अरुण चव्हाण (रहाटणी) या शिक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला.




यावेळी अण्णा जोगदंड म्हणाले... 'मोबाइल आणि इंटरनेटच्या या आधुनिक काळात विद्यार्थ्यांना पुस्तकी अभ्यासक्रम शिकविण्याचे कौशल्य जपत संस्काराची शिदोरी देण्याचे काम शिक्षक करीत असतात. या गुरुजनांना वंदन करताना अत्यानंद होत आहे.'

कार्यक्रमाचे अध्यक्ष नारायण कुंभार म्हणाले... 'कुंभार जसे मडके घडवतो तसे शिक्षक विद्यार्थी घडवीत असतात. शालेय शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षण देण्याची खरी गरज आहे!'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलासा समूहाचे शामराव सरकाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रदीप गांधलीकर यांनी केले; तर आभार मुरलीधर दळवी यांनी मानले.

मीरा कंक, दैवता घोरपडे, हिरामण देवरे, सुरेश चव्हाण, उज्ज्वला पवार, सुनंदा अमृतकर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

## चिमुकलीवरील अत्याचाराने मावळ हादरले
## टाकवे बुद्रुकमध्ये मूक मोर्चा

■ **वडगाव मावळ (दै. संध्या)**

चिमुकलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण मावळ तालुका हादरला असून, या घटनेच्या निषेधार्थ टाकवे बुद्रुक येथे नागरिकांनी एकजूट दाखवत मूक मोर्चा, निषेध सभा आणि बाजारपेठ बंद ठेवून तीव्र संताप व्यक्त केला.

दोन दिवसांपूर्वी टाकवे बुद्रुक येथे एका दोन वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली. याप्रकरणी वडगाव मावळ पोलिसांनी बाळू नामदेव वाचवले या आरोपीस अटक केली असून, या घटनेचे तीव्र पडसाद मावळ तालुक्यात उमटले आहेत. या पार्श्वभूमीवर टाकवे बुद्रुक येथे खंडोबा चौकात झालेल्या निषेध सभेला महिला, युवक, ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी देवा गायकवाड, शिवाजी असवले, सदानंद पिलाणे, अनिल मालपोटे, मुनावर अत्तार, अंकुश आंबेकर, संध्या असवले, सुवर्णा असवले, बाळासाहेब मालपोटे, आदिनाथ जांभुळकर, अक्षय ननवरे, जितेंद्र ननवरे, यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला.

निषेध सभेनंतर येथून मूक मोर्चा काढण्यात आला. कोणतीही घोषणाबाजी न करता शांततेत निघालेल्या या मोर्चातून नागरिकांनी आपल्या संतापाला वाट करून देतानाच पीडित बालिकेला न्याय मिळवून देण्याची ठाम भूमिका व्यक्त केली. मोर्चानंतर पोलिस प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

“चिमुकलीला न्याय मिळालाच पाहिजे, आरोपीवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे,” अशी एकमुखी मागणी या वेळी करण्यात आली. आरोपीला अटक झाल्याबद्दल प्रशासनाचे आभार मानण्यात आले; मात्र केवळ अटक करून प्रकरण थांबता कामा नये. तपास वेगाने पूर्ण करून सक्षम दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करावे, अशी मागणी नागरिकांनी केली. गावात तणावपूर्ण वातावरण असल्याने पोलिस निरीक्षक शंकर पाटील यांनी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवला होता.

या घटनेतील आरोपी स्थानिक असून, पीडित कुटुंब हे परप्रांतीय आहे. परंतु, ही घटना अत्यंत निर्दयी व लाजिरवाणी असल्याच्या भावनेतून टाकवे ग्रामस्थांनी एकत्र येत स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद पाळून मूक मोर्चा व निषेध व्यक्त केला.

## ध्वनी प्रदूषणाच्याबाबत संपूर्ण महाराष्ट्रात एकच धोरण लागू करा - रविराज काळे

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पुणे हे सामाजिक सुधारणा आणि वैचारिक चळवळींची परंपरा असलेले शहर आहे. अशा शहरात एखाद्या नागरिकाने ध्वनीप्रदूषणाचा प्रश्न उपस्थित केला म्हणून त्याची हेटाळणी करणे किंवा त्याच्यावर हल्ला करणे योग्य नसल्याचे रविराज काळे म्हणाले. विद्यानंद बापट यांच्यावर झालेल्या हल्ल्यानंतर पुण्यात डीजे आणि ध्वनीप्रदूषणाचा विषय अधिक तीव्रतेने चर्चेत आला आहे. त्याचवेळी नागपूरमध्ये डीजे आणि लेझरबाबत निर्बंधांची भूमिका घेतली जात असल्याने राज्यभर एकसमान धोरणाची मागणी केली आहे' सरकारने डीजेबाबत स्पष्ट राज्यव्यापी धोरण निश्चित करून त्याची सर्व शहरांत समान अंमलबजावणी करावी, अशी मागणी आपचे युवक प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांची आहे.

डीजे आणि त्यामुळे होणाऱ्या तीव्र ध्वनीप्रदूषणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारने शहरनिहाय वेगवेगळी भूमिका घेण्याऐवजी संपूर्ण महाराष्ट्रासाठी एकच स्पष्ट धोरण ठरवावे. मुंबईत कारवाई, नागपुरात निर्बंध आणि पुण्यात वेगळी भूमिका असे वेगवेगळे नियम का ? सरकारने ठरवावे की डीजे हवा आहे की नको. मंत्रिमंडळात निर्णय घ्यावा आणि त्याची संपूर्ण राज्यात समान अंमलबजावणी करायला हवी..

नागपुरात पोलिस आयुक्तांनी डीजे आणि लेझरच्या वापरावर निर्बंध आणले आहेत. मुंबईतही अशा प्रकारांवर कारवाई केली जाते आहे . मग पुण्यासाठी वेगळे आणि महाराष्ट्रातील अन्य शहरांसाठी वेगळे निकष का आहेत. विद्यानंद बापट यांनी पुण्यात ध्वनीप्रदूषणाविरोधात घेतलेल्या भूमिकेला पुणेकरांचा पाठिंबा आहे आज मोठ्या प्रमाणात पुण्यातील नागरिकांनी बालगंधर्व चौक ते पुणे महानगरपालिका समोर पर्यंत एकत्र येत मोर्चा देखील काढला असल्याचे रविराज काळे यांनी सांगितले. डीजेमुळे निर्माण होणारा प्रचंड आवाज नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करणारा असून हा प्रश्न मुख्यमंत्री एका दिवसात सोडवू शकतात, मग त्यासाठी 'लोकसंवादाची गरज काय असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संवाद आवश्यक असला, तरी सरकारकडे ठोस निर्णयक्षमता आणि राजकीय इच्छाशक्तीही असली पाहिजे, डीजे आणि ध्वनीप्रदूषणाच्या प्रश्नावर सर्वपक्षीय बैठक बोलावून राज्यव्यापी धोरण ठरवावे, अशी आमची मागणी आहे .सरकारला अनेक राजकीय निर्णय काही तासांत घेता येतात. मग नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित डीजेच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी एवढा वेळ का लागतो?' असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. डीजेचा मुद्दा केवळ ध्वनीप्रदूषण किंवा सामाजिक प्रश्नापुरता मर्यादित राहिलेला नसून त्याला राजकीय वळण प्राप्त झाल्याचे आहे . सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये विविध राजकीय पक्षांशी संबंधित कार्यकर्ते असतात. त्यामुळे या विषयावर सर्वपक्षीय बैठक घेऊन स्पष्ट भूमिका निश्चित करणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते.

# विद्यार्थी भारताच्या उज्वल भविष्याचे शिल्पकार - पद्माताई भोसले

■ **पिंपरी (दै. संध्या)**

आजचे विद्यार्थी भारताच्या उज्वल भविष्याचे शिल्पकार आहेत. त्यांना ज्ञान, मूल्य, कौशल्य आणि आत्मविश्वासाने समृद्ध करण्यासाठी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे एस. बी. पाटील पब्लिक स्कूल नेहमी विद्यार्थी केंद्रबिंदू मानून काम करीत आहे. याची योग्य दखल घेऊन "आंतरराष्ट्रीय शाळा मान्यता परिषद"च्या वतीने एस. बी. पाटील पब्लिक स्कूलला यावर्षी राष्ट्रीय पातळीवर तीन पुरस्कार मिळाले हे अभिमानास्पद आहे असे पीसीईटी उपाध्यक्ष पद्माताई भोसले यांनी सांगितले.

"आंतरराष्ट्रीय शाळा मान्यता परिषद"च्या (इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ स्कूल ॲक्रेडिशन) वतीने एस. बी. पाटील पब्लिक स्कूलला "शैक्षणिक उत्कृष्टता पुरस्कार २०२६" (अकॅडमी एक्सलन्स), स्कूलच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांना "उत्कृष्ट अध्यापन व प्रशासकीय कौशल्य पुरस्कार २०२६" आणि मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी यांना "उत्कृष्ट प्रशासकीय व प्रेरणादायी कौशल्य पुरस्कार २०२६" दिल्ली येथे




झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करण्यात आला. १०+२ या शालेय शिक्षण पद्धतीत उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणे. पारंपरिक मूल्यमापनाच्या पलीकडे जाऊन संस्थात्मक विकास, सहकारी मूल्यमापन, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि सातत्यपूर्ण सुधारणा यावर विशेष भर देणाऱ्या शालेय संस्था, मुख्याध्यापक, प्रशासक यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

यावर्षीच्या पुरस्कारासाठी देश पातळीवर अंतिम फेरीमध्ये ३०० प्रवेशिकांची निवड झाली होती, त्यातून एस. बी. पाटील पब्लिक स्कूलला एकूण तीन पुरस्कार मिळाले. हे पुरस्कार शाळेसाठी आणि संस्थेसाठी अभिमानाचा महत्त्वपूर्ण टप्पा आहेत.

उत्कृष्टता, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि उद्देश पूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या शाळेच्या वचन बद्धतेची यामुळे पुनर्प्रचिती येते असे पीसीईटी उपाध्यक्ष पद्माताई भोसले यांनी पुरस्कार्थींचे अभिनंदन करताना सांगितले.

या उल्लेखनीय यशाबद्दल पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले सचिव, विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केले.

या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्राचार्य डॉ. बिंदू सैनी यांना देशभरातून आलेल्या पुरस्कार्थींसमोर 'आजच्या काळातील मानसिक आरोग्याचे वाढते महत्व' या विषयावर व्याख्यान देण्याचा बहुमान मिळाला. सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे तरुणांवर येणारा मानसिक ताण तसेच पालकांच्या अपेक्षांवर होणारा विपरीत परिणाम याविषयी त्यांनी विचार व्यक्त केले.





## बिजलीनगर येथील महावितरणच्या सबस्टेशनमध्ये मोठा स्फोट

■ **पिंपरी (दै. संध्या)**

बिजलीनगर येथील महावितरणच्या सबस्टेशनमध्ये मोठा स्फोट झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे चिंचवड, पिंपरी, थेरगाव, काळेवाडी, रहाटणी, पिंपळे सौदागर परिसरातील वीजपुरवठ्यावर परिणाम झाला असून, खबरदारीचा उपाय म्हणून वीजपुरवठा अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्यात आला आहे. हा स्फोट नेमका कशामुळे झाला, याबाबतची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. महावितरणच्या संबंधित पथकाकडून घटनास्थळी पाहणी करून परिस्थिती पूर्ववत करण्याचे काम सुरू आहे. वीजपुरवठा बंद असल्याने नागरिक तसेच व्यावसायिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. वीजपुरवठा कधी सुरळीत होईल, याबाबत अद्याप निश्चित वेळ जाहीर करण्यात आलेली नाही. अधिकृत माहिती मिळाल्यानंतर पुढील अपडेट देण्यात येईल.

दैनिक संध्या
सोमवार, दि. ०७ सप्टेंबर २०२६





# जुन्नर तालुक्यातील पाच गुणवंत शिक्षकांचा नेशन बिल्डर अ‍ॅवार्डने गौरव

■ जुन्नर (दै. संध्या)

जुन्नर शिक्षक दिनाचे औचीत्याने रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या वतीने उल्लेखनीय शैक्षणिक कार्य करणाऱ्या पाच शिक्षकांचा 'नेशन बिल्डर अ‍ॅवार्ड' देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास विज्ञान संवादक GMRT चे माजी वरिष्ठ अधिकारी डॉ. जय सोळंकी, रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रशांत खत्री यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

प्रवीण ताजणे सर (अण्णासाहेब आवटे विद्यामंदिर, जुन्नर) वैशाली ससाणे (विभागप्रमुख गाजरे बालक मंदिर जुन्नर), अर्चना काशीद (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारुंडे), मुकुंद दिघे (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खडकुबे) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गणेश राऊत (सरदार पटेल विद्यालय, आणे) आदी शिक्षक वर्गाला नेशन बिल्डर अ‍ॅवार्ड'ने सन्मानित करण्यात आले.

शिक्षक हा केवळ विषय शिकविणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण करणारा आणि समाजाच्या भवितव्याची पायाभरणी करणारा घटक आहे. त्यामुळे शिक्षकांच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम स्तुत्य आहे प्रतिपादन डॉ. जय सोळंकी यांनी केले.

रोटरीचे अध्यक्ष प्रशांत खत्री, सचिव पवन गाडेकर, लिटरेसी डायरेक्टर हितेंद्र गांधी आणि प्रोजेक्ट इन्चार्ज धनंजय राजुरकर यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ सुनील शेवाळे, तुषार लाहोरकर,विजय कोल्हे, विलास कडलक,चेतन शहा,सुनील जाधव, डॉ सागर शिंदे ,नितीन माळवदकर,,हेमंत गरीबे, रवींद्र माळी , विकी पंजवाणी ,सचिन ताथेड,तसेच शिक्षक वर्ग यावेळी उपस्थित होते. शिक्षकांच्या कार्याचा समाजासमोर गौरव व्हावा आणि इतर शिक्षकांनाही प्रेरणा मिळावी या उपक्रमामागील उद्देश असल्याचे रोटरीचे अध्यक्ष प्रशांत खत्री यांनी सांगितले.

# रा. प. सबनीस कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

■ नारायणगाव (दै. संध्या)

गुरुवर्य रा. प. सबनीस कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शिक्षणतज्ज्ञ व तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमास विद्यामंदिराच्या प्रभारी मुख्याध्यापिका मानसी भालेराव, पर्यवेक्षक सुनील ढवळे, अनुपमा पाटे तसेच उपप्राचार्य संजय वलटे विज्ञान विभाग प्रमुख नितीन पोखरकर सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना उपप्राचार्य संजय वलटे यांनी विद्यार्थ्यांना गुरुंचे जीवनातील महत्त्व तसेच शिक्षक दिनाचे महत्त्व पटवून दिले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो, असे सांगून विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती सदैव आदर व कृतज्ञता बाळगावी, असे मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी आर्यन खांडगे, सानवी नाईक, मनीषा देवासी, दर्शन लोखंडे व प्राजक्ता बागुल यांनी शिक्षकांविषयी आपली मनोगते व्यक्त केली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी संतोष देशपांडे सर यांनी आपल्या मनोगतात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगितले. राष्ट्रपती असतानाही शिक्षण क्षेत्राबद्दल असलेली त्यांची निष्ठा आणि शिक्षकांप्रती असलेला आदर याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विज्ञान विभाग प्रमुख नितीन पोखरकर सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रत्येकाने आपल्या कामात तत्पर, प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ असावे, असा मौलिक संदेश दिला.

या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी संतोष देशपांडे तसेच सहाय्यक अधिकारी वनिता जगताप, जयश्री कोल्हे, मनीषा देशमुख, ज्योती वाबळे, साहेबराव गाळव व शैलेश कावळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणय वायकर यांनी केले, तर समर्पित शहा यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुरोगामी विद्यालयात विद्यार्थ्यांनी बजावली शिक्षकांची कर्तव्य

हवेली : दैनिक संध्या

आज विद्यालयात नवीन सर नवीन मॅडम दिसत होत्या घंटा देणारे शिपाई काका ही दुसरेच दिसत होते. मुलांच्या चेहऱ्यावर कुतुहलाचे भाव होते. शिक्षक वर्गात अतिशय आत्मविश्वासाने अध्यापन करत होते.पण वर्गातील विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारल्यावर शिकवणा-यांच्या चेह-यावर गोंधळाचे, भितीचे सावट पसरत होते.निमित्त होते शिक्षक दिन.भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनी साजरा होणारा शिक्षक दिन नुकताच पुरोगामी विद्यालय नायगाव ता. हवेली या विद्यालयात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावून साजरा केला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक बनलेल्या पल्लवी लांडगे व पर्यवेक्षक बनलेल्या युवराज म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक म्हणून पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याचे काम केले. यावेळी विद्यार्थ्यांना अनेक अनुभव आले. त्यातून शिक्षकीपेशा राष्ट्र घडवण्याचे माध्यम असल्यामुळे किती मोठी जबाबदारी शिक्षकांवर आहे याची कल्पना विद्यार्थ्यांना आली. या प्रसंगी शिक्षक बनलेल्या विद्यार्थ्यांनी विषय अध्यापनाबरोबच मैदानी खेळ घेतले. विद्यालयातील सर्व शिक्षकांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान केला.या कार्यक्रमात शिक्षकांची कर्तव्य पार पाडताना आलेले अनुभव कथन करताना अनेक कुटुंबातून, वेगवेगळ्या संस्कारातून आलेल्या विद्यार्थ्यांना समजून घेणे व अध्यापन करणे खरंच खूप अवघड आहे पण आपले शिक्षक किती सहजतेने हे काम करत आहेत त्याबद्दल त्यांना मानाचा मुजरा असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी चांगभले व तृप्ती यादव यांनी केले तर आभार मानसी सगर हिने मानले. कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख सविता देवकर, राजेश गोसावी, रोहिणी म्हेत्रे, वृषाली देशपांडे यांनी केले.



### चाकणला ज्ञानवर्धिनी विद्यालयात दहीहंडी दिमाखात साजरी

चाकण : दैनिक संध्या

स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कुल तसेच स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज मध्ये दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, प्राचार्या प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, पर्यवेक्षक सविता कुमकर आदी उपस्थित होते. दहीहंडी उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, बलराम, राधा, सुदामा, पेंद्या, यशोदा मैया, नंदराजा आदींच्या वेशभूषा केल्या होत्या. शिक्षकांनी दहीहंडी बांधून विद्यार्थ्यांकडून मानवी थर रचत दहीहंडी फोडून घेतली. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी व संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांनी यावेळी शिक्षकांचे कौतुक केले. शाळेत शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना आपल्या पारंपरिक सण-उत्सवांची माहिती मिळावी, त्यांचे सांस्कृतिक महत्त्व समजावे आणि विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभागातून त्याचा अनुभव घ्यावा, यासाठी शिक्षक सातत्याने प्रयत्न करत असल्याचे विकास गोरे यांनी सांगितले. यावेळी प्राचार्या प्रमिला गोरे यांनी भगवान श्रीकृष्णाच्या बाल लिला व दहीहंडीच्या परंपरेमागील आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व सांगितले. श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांसोबत घरातील दही मिळावे म्हणून उंचावर ठेवलेली दह्याची हंडी फोडत असत. या बाल लिलेतून गोपाळकाला व दहीहंडी उत्सवाची परंपरा रूढ झाली. संगीता पाटील, कविता भोसले, सुनील कोटलवार, सागर पवार, लीना नारखेडे, अर्चना माळी, उर्मिला कोबल, मनीषा दातीर, सुनील वडेकर, गणेश काळे, अनिता देसाई, रुपाली लांडे आदींचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

# राजकोटच्या भुईमूग शेंगांसह लसुण, दोडका व वाटाणा यांची विक्रमी आवक

■ चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये राजकोटच्या भुईमूग शेंगांसह लसुण, दोडका, कारली, वाटाणा यांची विक्रमी आवक झाली. पालेभाज्यांचे भाव तेजीत राहिले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ५० लाख रुपये झाली.



चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार ७५० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,५०० ते ५,२०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,६०० क्विंटल झाली. बटाट्याचा कमाल भाव १,५०० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १८ हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३२५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला १ हजार ५०० रुपयांपासून ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - १,७५० क्विंटल. भाव क्रमांक - १. ५,२०० रुपये, भाव क्रमांक २. ४,००० रुपये, भाव क्रमांक ३. १,५०० रू. बटाटा - एकूण आवक - १,६०० क्विंटल.भाव क्रमांक १.१,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.७०० रुपये.

फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ३३५ क्विंटल (८०० ते १,६०० रू.), कोबी - २३१ क्विंटल (७०० ते १,२०० रू.), फ्लॉवर - १९१ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), वांगी - ९५ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), भेंडी - १३५ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), दोडका - ६५ क्विंटल (१,५०० ते ४,००० रु.), कारली - ७० क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ७२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ६८ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), फरशी - ५६ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), वालवड - ७६ क्विंटल (१,००० ते ३,००० रुपये), ढोबळी मिरची - १४८ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), चवळी - ६२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), शेवगा - ४५ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), गाजर - १४० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - ६८ क्विंटल (४,००० ते ७,००० रु. ), आले - १९० क्विंटल (६,००० ते १३,००० रु. ),. रताळी - ४० किंवटल (३,००० ते ४,००० रु.), भुईमूग शेंगा - ६० क्विंटल (४,००० ते ५,००० रुपये.)

# शिवनेरीवरील अतिक्रमणाविरोधात आक्रमक भूमिका

■ नारायणगाव (दै. संध्या)

जागतिक वारसा स्थळ असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी किल्ले शिवनेरीवर होत असलेल्या अतिक्रमणाच्या विरोधात पुणे जिल्हा भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष श्री. गणेशभाऊ कवडे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

किल्ले शिवनेरीच्या पवित्र भूमीवर होत असलेल्या दर्गा, मजार,थडगे यांसारख्या अतिक्रमणाबाबत तातडीने कठोर कारवाई करून अतिक्रमणे हटविण्यात यावीत. या मागणीसाठी जुन्नर तालुका तहसीलदार तसेच वनविभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शिवनेरी ही केवळ ऐतिहासिक वास्तू नाही, तर प्रत्येक शिवभक्ताच्या अस्मितेचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. शिवजन्मभूमीच्या पावित्र्याशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. किल्ले शिवनेरीवरील अतिक्रमण हटवून या जागतिक वारसा स्थळाचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत. अशी ठाम मागणी करण्यात आली. यावेळी जुन्नर नगरपरिषदेचे नगरसेवक नंदूभाऊ तांबोळी, मा. नगराध्यक्ष अनिल भाऊ मेहेर, अश्वमेध युवा मंच अध्यक्ष रोहित भाऊ वाबळे, शिवप्रतिष्ठान जुन्नर शहराध्यक्ष शुभम भाऊ खत्री उपस्थित होते.



# शिक्षक हे समाजाच्या भविष्याचे शिल्पकार : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

■ आळंदी (दै. संध्या)

"शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना शिकविणारा व्यक्ती नसून, तो समाजाच्या भावी पिढीला घडविणारा शिल्पकार आहे. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबरच संस्कार, शिस्त, आत्मविश्वास आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करीत असतात. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान करणे म्हणजे समाजाच्या भविष्याचा सन्मान करणे होय," असे प्रतिपादन नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त आळंदी नगरपरिषदेच्या वतीने आयोजित 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५-२६' वितरण सोहळ्यात ते बोलत होते. कासार समाज धर्मशाळा येथे झालेल्या या कार्यक्रमात आळंदी नगरपरिषद शाळा क्रमांक १च्या शिक्षिका जयश्री महेश नेहरे यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.



कार्यक्रमास मुख्याधिकारी माधव खांडेकर, माजी सभापती डि.डि.भोसले पाटील, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, गटनेते सचिन गिलबिले, नगरसेवक सागर कुऱ्हाडे, संतोष रासकर, दिनेश घुले, सुरेश झोंबाडे, नगरसेविका पुजा घुंडरे, प्रशासन अधिकारी (शिक्षण विभाग) सोनाली झिंजुर्डे यांच्यासह नगरपरिषदेचे पदाधिकारी, अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# शेठ गोविंद रघुनाथ साबळे महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

■ सासवड (दै. संध्या)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी अँड पॉली, सासवड येथे भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जयश्री नाळे यांनी केले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण, उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार, पॉलिटेक्निक विभागाच्या प्राचार्या व्ही. एस. गायकवाड, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत मनोगते व भाषणे सादर केली. उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना यशस्वी जीवनासाठी सकारात्मक दृष्टिकोन, शिस्त, आत्मविश्वास, चांगले संस्कार व मूल्यांची जोपासना करण्याचे आवाहन केले.

प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी जीवनात धैर्य, ध्येय आणि दृढनिश्चय बाळगून यशस्वी वाटचाल करावी. तसेच पर्यावरणप्रेम जपत सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. किरण आर. रणदिवे, प्राध्यापक व विभागप्रमुख, वनस्पतीशास्त्र विभाग, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, महादेवनगर, हडपसर यांचा परिचय प्रा. दीपाली जगताप यांनी करून दिला. डॉ. रणदिवे यांनी शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबत संस्कार, मूल्ये, सामाजिक जाणीव आणि जबाबदारी यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना जीवनात सकारात्मक दृष्टिकोन ठेवून ध्येयाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा मिळाली.

यावेळी शिक्षक तसेच विद्यार्थी-शिक्षकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या ज्ञानदानाच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक विभाग, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप सौ. पायल पाटसकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

ज्ञान, संस्कार आणि मूल्यांच्या माध्यमातून सक्षम व जबाबदार पिढी घडविणाऱ्या शिक्षकांच्या योगदानाचा गौरव करत शिक्षक दिनाचा हा प्रेरणादायी सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# भरधाव वाहनातून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रकार

## बारामती शहर पोलिसांची तत्काळ कारवाई

## गुन्हा दाखल करून वाहन जप्त; आरोपींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची व प्रतिबंधात्मक कारवाईची छाननी

## “नागरिकांनी निर्भय राहावे; सार्वजनिक शांतता व सुरक्षिततेला बाधा आणणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई”

■ बारामती (दै. संध्या)

बारामती शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, नागरिकांना सुरक्षित व निर्भय वातावरण उपलब्ध करून देणे तसेच सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींना वेळीच प्रतिबंध करणे यासाठी बारामती शहर पोलीस स्टेशनकडून सातत्याने प्रभावी कारवाई करण्यात येत आहे. दि. ०५/०९/२०२६ रोजी दुपारी सुमारे १४.०० वाजण्याच्या सुमारास इंदापूर चौक,बारामती येथे चारचाकी वाहन क्र. एम.एच. ४२ बी.एन.१०९५ हे सार्वजनिक व वर्दळीच्या रस्त्यावर अत्यंत वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवून इतर वाहनांना अचानक कट मारणे व धोकादायकरीत्या ओव्हरटेक करणे असा प्रकार घडला.त्याचवेळी वाहनाच्या टपावर बसलेला इसम तसेच वाहनाच्या खिडकीतून शरीर बाहेर काढलेला दुसरा इसम नागरिकांकडे हातवारे व इशारे करीत असल्याने परिसरातील नागरिक भयभीत झाले.काही नागरिक सुरक्षिततेसाठी रस्त्याच्या बाजूला गेले,तर काही वाहनचालकांना आपली वाहने बाजूला घेऊन थांबवावी लागली. त्यामुळे काही काळ सार्वजनिक रस्त्यावरील वाहतुकीच्या सुरळीत प्रवाहावर परिणाम झाला व नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले. या घटनेची गंभीर



दखल घेत बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३६६/२०२६, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१, २८५ तसेच मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १२३(१), १२३(२), १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये योगेश बापु लोंढे, किशोर संजय ढोरे उर्फ मोठा डावर व एक अनोळखी इसम यांचा समावेश आहे. गुन्ह्यात वापरण्यात आलेले चारचाकी वाहन पोलिसांनी ताब्यात घेतले असून,वाहनाची नोंदणी कागदपत्रे,वास्तविक मालकी,वाहन आरोपींच्या ताब्यात कशा प्रकारे आले तसेच वाहनाच्या वापरासंबंधी अन्य बाबींची तपासणी करण्यात येत आहे.

आरोपी किशोर संजय ढोरे उर्फ मोठा डावर याच्याविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर पूर्वीपासून विविध स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद आहे. त्याच्या उपलब्ध गुन्हेगारी रेकॉर्डमध्ये दुखापत,मारामारी व जबरी चोरीसारख्या स्वरूपाच्या गुन्ह्यांचा समावेश असल्याने त्याच्या संपूर्ण पूर्वइतिहासाची तसेच यापूर्वी करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक कारवायांची तपासाच्या अनुषंगाने छाननी करण्यात येत आहे. सदर आरोपी MCOCA प्रकरणातून जामिनावर मुक्त झालेला असल्याची बाब संबंधित न्यायालयीन अभिलेख व जामीन आदेशाच्या आधारे पडताळून,सद्य गुन्ह्याचा त्याच्या जामीन अटींवर काही परिणाम होत असल्यास त्याबाबत कायद्यानुसार सक्षम न्यायालयास आवश्यक अहवाल सादर करण्याची कार्यवाही केली जाईल. जामीन हा न्यायालयाने दिलेला कायदेशीर अधिकार आहे; मात्र जामिनावर असताना घालून दिलेल्या अटींचे उल्लंघन अथवा नवीन गुन्हा केल्याचे पुराव्यांवरून आढळल्यास कायद्यानुसार आवश्यक कार्यवाही केली जाईल. गुन्हेगारी पार्श्वभूमीचा धाक दाखवून नागरिकांमध्ये भीती निर्माण करणे,सार्वजनिक ठिकाणी दहशतीचे वातावरण निर्माण करणे, टोळीच्या माध्यमातून वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे अथवा नागरिकांच्या मुक्त व सुरक्षित वावरास बाधा आणणे अशा कोणत्याही प्रकाराकडे बारामती शहर पोलीस गंभीरतेने पाहतील. बारामती शहर पोलिसांचा संदेश स्पष्ट आहे - कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांच्या पाठीशी पोलीस ठामपणे उभे आहेत. सार्वजनिक शांतता आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला आव्हान देणाऱ्या प्रत्येक कृत्यावर पुरावे व कायदेशीर निकषांच्या आधारे तातडीने कारवाई केली जाईल. वारंवार गुन्हे करणाऱ्या व्यक्तींच्या हालचाली व गुन्हेगारी इतिहासाचा आढावा घेऊन प्रकरणाच्या स्वरूपानुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील प्रतिबंधक तरतुदी, महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत प्रतिबंधक/तडीपार कारवाई तसेच कायदेशीर निकष पूर्ण होणाऱ्या प्रकरणांमध्ये MPDA व MCOCA सारख्या विशेष कायद्यांतील तरतुदींचा सक्षम प्राधिकरणामार्फत विचार केला जाईल.पोलीस अभिलेखामध्ये पुनरावृत्तीने गुन्हे करणाऱ्या आरोपींबाबत विविध प्रतिबंधक उपाययोजनांचे नियोजन करण्यात येत असल्याची नोंद आहे. किशोर संजय ढोरे उर्फ मोठा डावर अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून धमकी, मारहाण, खंडणी, जबरदस्ती, बेकायदेशीर वसुली, मालमत्तेचे नुकसान, दहशत अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा गुन्हेगारी त्रास झाला असल्यास संबंधित नागरिकांनी कोणत्याही दबावाखाली न राहता बारामती शहर पोलीस स्टेशनशी संपर्क साधून वस्तुस्थितीनुसार तक्रार द्यावी. तातडीच्या प्रसंगी डायल ११२ वर संपर्क साधावा. तसेच गुन्हेगारी हालचालींबाबत विश्वासार्ह माहिती असल्यास प्रभारी पोलीस निरीक्षक,बारामती शहर पोलीस स्टेशन यांच्याशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्या व्यक्तीच्या ओळखीबाबत कायद्यानुसार आवश्यक गोपनीयता राखण्यात येईल.

### बारामती शहर पोलिसांचे नागरिकांना आवाहन

“कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांनी कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नाही.मात्र गुन्हेगारी पार्श्वभूमीचा धाक, टोळीचे वर्चस्व किंवा सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करून शहराच्या शांततेला बाधा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध उपलब्ध पुरावे आणि कायदेशीर निकषांनुसार प्रभावी गुन्हेगारी व प्रतिबंधक कारवाई केली जाईल.गुन्हेगारांवर कायद्याचा वचक आणि नागरिकांना सुरक्षित, शांत व निर्भय वातावरण — यासाठी बारामती शहर पोलीस कटिबद्ध आहेत.”

“नागरिकांच्या मनातील गुन्हेगाराची भीती कमी करून कायद्यावरील विश्वास अधिक मजबूत करणे हेच प्रभावी पोलिसिंगचे उद्दिष्ट आहे. बारामतीकरांनी निर्भय राहावे; पोलीस त्यांच्या सुरक्षिततेसाठी सदैव सज्ज आहेत.”

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल्ल,अपर पोलीस अधीक्षक श्री.गणेश बिरादार व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.चैतन्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर कामगिरीमध्ये बारामती शहर पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री.सर्जेराव पाटील,पोलीस हवालदार श्री.रामचंद्र शिंदे,पोलीस शिपाई श्री.अक्षय सिताफ व महिला पोलीस शिपाई श्रीमती भाग्यश्री देवकाते यांनी सहभाग घेतला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कै.वसंतराव पवार यांच्या स्मृतीदिनानिमित्त जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

कोऱ्हाळे : दैनिक संध्या

कै. वसंतराव पवार यांच्या स्मृती दिनानिमित्त कै.नामदेवराव पाटील सार्वजनिक वाचनालय कोऱ्हाळे बु || यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.युवानेते युगेंद्र पवार,जिल्हा परिषद सदस्या रोहिणी ताई कदम यांच्या उपस्थितीत दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.1 ली ते 4 थी ,5 वी ते 7 वी, व 8 वी ते 10 वी या तीन गटांमध्ये स्पर्धा पार पडल्या.विजेत्या मुलांना प्रशस्तीपत्र,मेडल व रोख रक्कम अशी मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सतिश मामा खोमणे,सोमेश्वर कारखान्याचे संचालक सुनील तात्या भगत, मारुती माळशिकारे,पत्रकार चिंतामणी क्षीरसागर,राहुल मिसाळ,डि.एम.खोमणे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी सौ. साळवे मॅडम यांनी सुत्र संचालन केले.तसेच भोसले सर,चव्हाण सर व त्यांचे सहकारी यांनी कार्यक्रमासाठी मोलाचे योगदान दिले.

### माळेगाव पोलीस स्टेशनची अवैध धंद्यावर धडक कारवाई

माळेगाव : दैनिक संध्या

माळेगाव पोलीस स्टेशन हद्दीत तंबाखूजन्य पदार्थांची विक्री तसेच अवैध दारूधंद्यांविरोधात माळेगाव पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे या मोहिमेंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI), माळेगाव या शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात असलेल्या ‘मैत्री पानटपरी’ व ‘मधुबन पानटपरी’ येथे तपासणी करण्यात आली. सदर ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थ व सिगारेट विक्रीसंदर्भात कारवाई करण्यात आली. सदर कारवाईमध्ये इसम नामे बाळकृष्ण सर्जेराव अवघडे व इसम नामे विजय कांतीलाल यादव, दोघे रा. माळेगाव, ता. बारामती, जि. पुणे, यांच्याविरुद्ध COTPA Act, 2003 मधील कलम 6(ब) व संबंधित शिक्षेच्या तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात आली. तसेच माळेगाव, पणदरे व कऱ्हावागाज या गावांमध्ये अवैध दारूधंद्यांविरोधात विशेष मोहीम राबवून एकूण ०४ मोठ्या कारवाया करण्यात आल्या आहेत. अवैध दारू विक्री व निर्मिती करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरू असून, अशा प्रकारचे अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर यापुढेही सातत्याने कारवाई करण्यात येणार आहे. सदर कारवाई सपोनि कुलदीप संकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साळवे, पोलीस हवालदार अमर थोरात, विजय वाघमोडे, अजय अवघडे, महेश पठारे पोलीस शिपाई ज्ञानेश्वर मोरे, सागर पवार व नंदकुमार गव्हाणे यांनी केली. माळेगाव पोलीस स्टेशनकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री अथवा सेवन होत असल्याचे निदर्शनास आल्यास तसेच अवैध दारूधंद्यांची माहिती असल्यास पोलिसांना तत्काळ माहिती द्यावी.

### भारतातील नव्या पिढीच्या प्रवाशांसाठी संयुक्त-ब्रँडेड क्रेडिट कार्ड सादर

पुणे : दैनिक संध्या

भारतातील आघाडीची ट्रॅव्हल फिनटेक कंपनी स्कॅपिया आणि भारतातील आघाडीच्या खासगी क्षेत्रातील बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेने आज स्कॅपिया ॲक्सिस बँक क्रेडिट कार्ड सादर केले. भारतातील नव्या पिढीच्या प्रवाशांना लक्षात घेऊन हे कार्ड डिझाइन करण्यात आले असून, प्रत्येक खर्चाला त्यांच्या पुढील प्रवासाकडे नेणारे एक पाऊल मानले आहे. हे कार्ड पेमेंट्स, रिवॉर्ड्स आणि प्रवासाचा अनुभव एका एकत्रित डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणते. स्कॅपिया ॲपच्या माध्यमातून ग्राहकांना खर्चाचे व्यवस्थापन व ट्रॅकिंग, प्रवासाचे बुकिंग तसेच रिवॉर्ड्सचे रिडेम्प्शन करता येते. पात्र कार्ड खर्च आणि यूपीआय व्यवहारांवर रिवॉर्ड्स मिळतात.




## कष्टकरी मजुरांच्या मुलांसाठी डायपर दहीहंडीतून डायपर वाटप

■ पुणे (दै. संध्या)

■ अक्षय कोठावळे मित्र मंडळाच्या पुढाकारातून कामगारांच्या मुलांसाठी विधायक उपक्रम

पुण्यात बाहेरील जिल्हा आणि राज्यातून आलेल्या बांधकाम मजुरांच्या मुलांसाठी डायपर दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते यासाठी अक्षय कोठावळे यांनी पुढाकार घेतला अक्षय कोठावळे म्हणाले की पुणे शहरात विविध जिल्ह्यातून आणि परराज्यातून अनेक मजूर कामगार हे सहपरिवार येत असतात ते कामाच्या ठिकाणी काम करून राहतात घरातील स्त्री व पुरुष दोघेही काम करीत असताना त्यांच्या मुलांचा नैसर्गिक विधीची सोय व्हावी या उद्देशाने आम्ही पाचशे एक डायपर पॅडचे मोफत वाटप केले आहे कष्टकरी मुलांचे आरोग्य व्यवस्थित राहणार असून स्वच्छता देखील राहणार आहे. डायपर दहीहंडी निमित्ताने अक्षय कोठावळे, प्रफुल काकडे,विजय शागीरर आणि त्यांच्या मित्र परिवाराने लहान मुलांसाठी डायपर दहीहंडी बांधण्यात आली होती. लहान मुलांच्या हस्ते ही दहीहंडी फोडत त्यांच्या पालकांना डायपर चे मोफत वाटप करण्यात आले.

## पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांवर माळेगाव पोलिसांची कारवाई

### ३४ चारचाकी वाहनांवर कारवाई; ₹३५,०००/- दंड व दोन वाहनांवर गुन्हे दाखल

■ पुणे (दै. संध्या)



दहीहंडी उत्सवाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच सार्वजनिक ठिकाणी हुल्लडबाजी, वाहतूक नियमांचे उल्लंघन व नागरिकांना त्रास होणार नाही, यासाठी मा. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली माळेगाव पोलीस स्टेशन हद्दीत विशेष नाकाबंदी व वाहन तपासणी मोहीम राबविण्यात आली. दरम्यान, दहीहंडी उत्सवाकरिता पुणे येथे जाणाऱ्या काही चारचाकी वाहनांमधून हुल्लडबाजी करणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे तसेच वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक व्यक्ती प्रवास करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार माळेगाव पोलिसांनी एकूण ३४ चारचाकी वाहनांवर कायदेशीर कारवाई करून एकूण ₹३५,०००/- रुपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच, गंभीर स्वरूपाचे नियमभंग करणाऱ्या २ वाहनचालकांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८५ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दहीहंडी तसेच आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, वाहन चालविताना मद्यपान करू नये, वाहनांमधून हुल्लडबाजी करू नये तसेच सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन माळेगाव पोलीस स्टेशनतर्फे करण्यात आले आहे. सदरची कारवाई मा.संदीपसिहं गिल सो पोलीस अधीक्षक पुणे, मा.अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार सो,मा. उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम सो यांच्या मार्गदशनाखाली सहा पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ,पो. उपनिरीक्षक देविदास साळवे, पो हवा सचिन होळकर, विजय वाघमोडे,अमजद शेख, संदीप वाघमोडे, काका पाटोळे,गणेश खंडागळे,विकास राखुंडे यांनी केली.

## पुण्यात ‘व्हिझ-किड’ रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत २५० हून अधिक खेळाडूंचा सहभाग

■ पुणे (दै. संध्या)

किंग्ज इंडियन चेस क्लब (KICC) आणि बाकलीवाल ट्युटोरियल्स (BT) यांच्या संयुक्त विद्यमाने, पुणे जिल्हा बुद्धिबळ मंडळाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या ‘व्हिझ-किड वन-डे रॅपिड चेस टूर्नामेंट’मध्ये पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील २५० हून अधिक बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला. रविवारी (दि. ३०) वाकड येथील युरो स्कूलमध्ये ही स्पर्धा झाली. स्विस लीग पद्धतीने सात फेऱ्यांमध्ये झालेल्या या स्पर्धेसाठी ६० हजार रुपयांचे एकूण पारितोषिक ठेवण्यात आले होते. ११ वर्षांखालील, १३ वर्षांखालील, १५ वर्षांखालील, ३५ वर्षांवरील तसेच मुलींसाठी विशेष अशा पाच गटांत स्पर्धा घेण्यात आली. विजेत्यांना चषक, पदके




आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. ११ वर्षांखालील खुल्या गटात आयुष जगतापने प्रथम, तीर्थ कोद्रा याने द्वितीय, तर विश्वजा देशमुखने तृतीय क्रमांक मिळविला. १३ वर्षांखालील गटात एएफएम कविश लिमये प्रथम, विभव गुप्ता द्वितीय आणि विहान शाह तृतीय ठरले. १५ वर्षांखालील गटात चंद्रमौली जयकृष्णनने विजेतेपद पटकावले. डब्ल्यूसीएम अन्वी हिंगे द्वितीय तर प्रथमेश सुतार तृतीय आला.

३५ वर्षांवरील खुल्या गटात एफएम गौरव बाकलीवालने प्रथम क्रमांक मिळविला. आयएम विक्रमादित्य कुलकर्णी द्वितीय आणि राहुल वर्मा तृतीय ठरले. मुली व महिलांच्या विशेष गटात ११ वर्षांखाली शाल्वी चस्कर, १३ वर्षांखाली अन्वी शेळके, १५ वर्षांखाली समायरा राय आणि ३५ वर्षांवरील गटात आशा ठोंबरे यांनी विजेतेपद मिळविले. स्पर्धेच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये राजस्थान राज्याचे माजी बुद्धिबळ विजेते तसेच जेईई १९९४ मध्ये अखिल भारतीय २२८२ वा क्रमांक मिळविलेले गौरव बाकलीवाल यांचा समावेश होता. बाकलीवाल ट्युटोरियल्सचे संस्थापक व संचालक वैभव बाकलीवाल यांनी विजेत्यांचा गौरव केला. त्यांनी सहभागी विद्यार्थ्यांसोबत कोडी व बुद्धिबळाशी संबंधित प्रश्नमंजुषेच्या माध्यमातून संवाद साधला.

## एआय+चा ‘नेक्स्ट क्वांटम ओएस १.१’सादर; वापरकर्त्यांच्या गोपनीयतेवर अधिक भर

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

एआय+ स्मार्टफोनने ‘नेक्स्ट क्वांटम ओएस’ची आवृत्ती १.१ सादर केली असून, या नव्या आवृत्तीत गोपनीयता संरक्षणाची चौकट अधिक मजबूत करण्यात आली आहे. तसेच, ॲप्लिकेशन्सना वापरकर्त्यांच्या उपकरणांवरील संसाधने आणि डेटाचा वापर कसा करता येतो, याबाबत अधिक पारदर्शकता आणि नियंत्रण वापरकर्त्यांना मिळणार आहे. डेटा सार्वभौमत्व आणि सुरक्षिततेच्या बांधिलकीचा भाग म्हणून ‘नेक्स्ट क्वांटम’मध्ये कठोर ‘सॉव्हरिन डेटा बाउंड्री’ लागू करण्यात आली आहे. त्यामुळे ॲप्लिकेशन्समधून होणारी १०० टक्के डेटा वाहतूक भारतातच उपलब्ध असलेल्या आणि भारतात होस्ट केलेल्या पायाभूत सुविधांमधून केली जाते. परिमिती सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी या प्रणालीद्वारे १,००० हून अधिक कनेक्शन्स आणि १७२ स्वतंत्र गंतव्य आयपींच्या सोर्स नियमांचे स्वयंचलित विश्लेषण केले जाते. विशेष म्हणजे, सर्व डेटा वाहतूक आणि आयपी पिंग्ज भारताच्या हद्दीतच मर्यादित राहतात. केवळ ऑपरेटिंग सिस्टमच्या आवश्यक मूलभूत कार्यांसाठी आवश्यक असलेली गुगलची काही कोअर सेवा कॅलिफोर्निया आणि सिंगापूरकडे निर्देशित केली जाते. या माध्यमातून डेटा अखंडतेला प्राधान्य देतानाच ‘नेक्स्ट क्वांटम ओएस’च्या चौकटीशी सुसंगतपणे वापरकर्त्यांच्या माहितीचे संरक्षण करण्याच्या बांधिलकीला अधिक बळकटी दिली जाते.

# गोवंशाच्या बेकायदेशीर व क्रूर वाहतुकीला बारामती शहर पोलिसांचा चाप

■ बारामती (दै. संध्या)

गोवंश जनावरांची बेकायदेशीर व संशयास्पद वाहतूक रोखणे, कत्तलीसाठी होणाऱ्या संभाव्य वाहतुकीला प्रतिबंध करणे तसेच वाहतुकीदरम्यान मुक्या प्राण्यांना अनावश्यक वेदना व त्रास होऊ नये यासाठी बारामती शहर पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत दोन जर्सी जातीच्या गायींची सुरक्षित सुटका केली आहे. या कारवाईमध्ये महिंद्रा कंपनीचे पिकअप वाहन व दोन जर्सी गायी असा एकूण रु. 2,50,000/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.





मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण श्री. संदीप सिंह गिल्ल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती श्री. चैतन्य कदम यांच्या आदेश व मार्गदर्शनाखाली, बारामती शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक श्री. सर्जेराव पुजारी, पोलीस हवालदार श्री. रामचंद्र शिंदे, पोलीस शिपाई श्री. विशाल चौधर व पोलीस शिपाई श्री. लतिफ इनामदार यांच्या पथकाने गोवंश बचाव कार्य करणाऱ्या टीममधील श्री. वैभव थोरात यांच्याकडून प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे सदर कारवाई केली.

दि. 03/09/2026 रोजी दुपारी सुमारे 12.00 वा. बारामती शहर हद्दीतील मॅकडॉल कंपनीसमोरील सार्वजनिक रस्त्यावर पांढऱ्या रंगाच्या महिंद्रा पिकअप वाहन क्र. MH-13-CU-2064 मधून दोन जर्सी जातीच्या गोवंश गायींची वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. प्राप्त माहितीची तातडीने दखल घेत पोलिसांनी वाहन व त्यामधील जनावरांची पडताळणी केली असता वाहनामध्ये एक काळसर रंगाची जर्सी गाय व एक काळ्या-पांढऱ्या रंगाची जर्सी गाय मिळून आली.

सदर वाहनाचा चालक शब्बीर इमाम शेख, रा. आसू, ता. फलटण, जि. सातारा याच्याकडे गायींची मालकी, खरेदी-विक्री, गायी कोठून आणल्या, कोणत्या ठिकाणी व कोणाकडे घेऊन जात आहे, वाहतुकीचा उद्देश व अंतिम गंतव्य याबाबत विचारणा करण्यात आली. तसेच जनावरांच्या वाहतुकीसाठी आवश्यक पशुवैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र व इतर संबंधित कागदपत्रांची मागणी करण्यात आली. मात्र त्याच्याकडून त्यावेळी समाधानकारक व पडताळणीयोग्य माहिती तसेच आवश्यक कागदपत्रे सादर झाली नसल्याचे प्राथमिक तपासात समोर आले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### काऱ्हाटीत गोकुळाष्टमी उत्साहात साजरी

**काऱ्हाटी : दैनिक संध्या**

काऱ्हाटी (ता. बारामती) येथे गोकुळ अष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सात दिवस अखंड विनावादन व नामसंकीर्तन भजन, भजनी मंडळ व एकतारी भजनी मंडळाने भजन सेवा करीत कृष्ण जन्माचा गोकुळ अष्टमी व ज्ञानेश्वर जन्माष्टमी एकत्रित रित्या उत्सव साजरा करण्यात आला. कृष्णाच्या नटखट गवळणी गाऊन व पाळणा म्हणून गोपाल कृष्णाचा जन्मोत्सव मोठ्या आनंदात साजरा केला. टाळ मृदंगाच्या गजरात, जयघोषात ग्राम प्रदक्षिणा पूर्ण करत पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम करण्यात आला.यावेळी श्री विठ्ठल प्रसादिक भजनी मंडळाचे सल्लागार सुरेश नाना बाबळे,विनायक आप्पा चांदगुडे, विठ्ठल प्रसाद योजना मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब वाबळे, उपाध्यक्ष प्रकाश बर्गे, सचिव ज्ञानदेव जाधव, अरविंद वाबळे, चंद्रकांत लोणकर, जितेंद्र वाबळे, पुजारी शरद चांदगुडे, मीरा परुळेकर, चंद्रकला वाबळे, अरुणा चांदगुडे, सुरेखा जाधव, रूपाली लोणकर, अलका लोणकर, आदी भजनी मंडळ ग्रामस्थ बहुसंख्य उपस्थित होते.




### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खामगाव येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**जुन्नर : दैनिक संध्या**

वाढदिवसाचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी योगदान देण्याचा प्रेरणादायी उपक्रम खामगाव येथे राबविण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खामगाव येथे कृष्णांगी हिच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्या व विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस, कौटुंबिक समारंभ किंवा आनंदाचे प्रसंग समाजोपयोगी पद्धतीने साजरे करण्याची गरज आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे म्हणजे त्यांच्या शिक्षणाला प्रत्यक्ष हातभार लावणे असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव निर्माण होण्यास मदत होते. डॉ. दत्ताशेठ खांडेभराड व रुपालीताई खांडेभराड यांच्या पुढाकारातून झालेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. वाढदिवसानिमित्त खर्च होणाऱ्या रकमेचा काही भाग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी वापरून समाजाला सकारात्मक संदेश देण्याचा हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय ठरला. कार्यक्रमास बाळासाहेब पारधी, किरण गभाले व रविंद्र विरणक यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंकुश घोलप, उपाध्यक्ष रेश्माताई घोलप, राम पठारे तसेच ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापक श तानाजी तळपे यांनी केले. दिलीप लोहकरे यांनी सूत्रसंचालन केले, तर राहुल रावते यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन विशेष प्रयत्न अंकुश कोकणे यांनी केले. आनंदाचे क्षण समाजाच्या उपयोगी आणून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# प्राचार्य नंदकुमार सागर यांना विजयी करा

## नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांचे आवाहन; सासवडमध्ये प्रचाराचा उत्साहात शुभारंभ

■ सासवड (दै. संध्या)

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव , राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या प्रचाराचा शुभारंभ शिक्षक दिनाचे औचित्य साधून शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात उत्साहपूर्ण वातावरणात झाला.




सासवड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या शुभहस्ते प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप म्हणाल्या, "शिक्षकांच्या प्रश्नांची जाण असलेले, शिक्षण क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव असलेले आणि शिक्षकांच्या समस्या प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेणारे सक्षम नेतृत्व आज विधानपरिषदेत पाठविण्याची गरज आहे. शिक्षकांचा आवाज सभागृहात प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्राचार्य नंदकुमार सागर यांना विजयी करून सभागृहात पाठवा," असे आवाहन त्यांनी केले.

प्राचार्य नंदकुमार सागर यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांचा सातत्याने अभ्यास करून शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षण संस्थांच्या समस्यांसाठी शासन व प्रशासन स्तरावर पाठपुरावा केला आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांची त्यांना केवळ कागदोपत्री माहिती नसून प्रत्यक्ष अनुभवातून त्यांची जाण आहे. अभ्यासू, अनुभवी आणि संवेदनशील नेतृत्व म्हणून प्राचार्य सागर यांची उमेदवारी शिक्षकांच्या प्रश्नांना प्रभावी व्यासपीठ मिळवून देणारी ठरेल, असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

शिक्षक दिनाच्या दिवशीच प्रचाराचा शुभारंभ झाल्याने या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. शिक्षकांच्या हक्कांसाठी, प्रश्नांसाठी आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी सक्षम नेतृत्वाच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार यावेळी उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष घोळवे, गुरुकुल अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष, प्राचार्य संदिप टिळेकर, मोशन एज्युकेशन इन्स्टिट्यूट पुणे विभागाचे संचालक नितीन भुजबळ, गौरव शर्मा, एन.जी.आर. असोसिएट पुणेचे अध्यक्ष राज लहाने, भाजपा शिक्षक आघाडीचे प्रशम कोल्हे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघाचे प्रवक्ते वसंतराव ताकवले, पुरंदर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष दिलीप नेवसे, मारुती झगडे, पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय रोकडे,प्राचार्य इस्माईल सय्यद, शिक्षक परिषद पुणे जिल्ह्याचे कार्यवाह शिवहार लहाने, शिक्षक परिषद पुरंदर तालुका अध्यक्ष विजय पिलाने, कार्यवाह दीपक भोसले, उपाध्यक्ष दत्तात्रय गायकवाड, प्रशांत बेंगळे व बिबीशन देडे, कार्याध्यक्ष विकास भोसले, संघटन मंत्री जितेंद्र कोकणी, महिला आघाडी प्रमुख स्वाती कामथे, संघटक किशोर जगताप, संघटन मंत्री दत्तात्रय बनकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ. मधुसूदन जगताप आणि विजय पिलाने यांनी केले.

## अखिल तळवाडी दहीहंडी महोत्सव उत्साहात संपन्न, मोरया प्रतिष्ठान संघाची बाजी

■ उरुळी कांचन (दै. संध्या)

उरुळी कांचन येथील तळवाडी परिसरात शनिवारी (ता. ५) सायंकाळी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या अखिल तळवाडी दहीहंडी महोत्सव २०२६ मध्ये राहू येथील मोरया प्रतिष्ठान गोविंदा संघाने दहीहंडी फोडत विजेतेपद पटकावले. दहीहंडी फोडणाऱ्या मोरया प्रतिष्ठान संघाला १ लाख ११ हजार १११ रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले.

दहीहंडी महोत्सवाच्या निमित्ताने तळवाडी परिसरात मोठी गर्दी झाली होती. ढोल-ताशांचा गजर, गोविंदा पथकांचा उत्साह आणि 'गोविंदा आला रे'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विविध गोविंदा संघांनी मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. अखेर राहू येथील मोरया प्रतिष्ठान संघाने दहीहंडी फोडत उपस्थितांची दाद मिळवली.

या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे आधारस्तंभ व उरुळी कांचन गावचे माजी सरपंच सुनील कांचन, मंडळाचे अध्यक्ष अनिल दत्तात्रय कांचन, तसेच भरत काळे, जयेश कांचन, आप्पा रानवडे, अक्षय कांचन, अभि रावडे आणि सुनील प्रजापती यांच्यासह अखिल तळवाडी मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांचे मोठे योगदान राहिले. महोत्सवाला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रमुख उपस्थिती लावली. यामध्ये जितेंद्र बडेकर (सभापती समाज कल्याण, पुणे), युवराज काकडे (पंचायत समिती सभापती, हवेली), संतोष आबासाहेब कांचन (संचालक, यशवंत सहकारी साखर कारखाना तथा माजी नियोजन समिती सदस्य), राजेंद्र (बापू) कांचन, मनीभाई पतसंस्था संस्थापक अध्यक्ष , व माजी सरपंच दत्तात्रय कांचन, संतोष हरिभाऊ कांचन, भाऊसाहेब कांचन, अजिंक्य महादेव कांचन (युवा नेते), अलंकार कांचन,सदस्य पुणे जिल्हा नियोजन समिती तसेच आदी मान्यवर पदाधिकारी ग्रामस्थ उपस्थित होते.



## सासवडमध्ये थरारक गोविंदा पथकांची धूम

### कन्हैयाचा ५५वा दहीहंडी सोहळा उत्साहात

■ सासवड (दै. संध्या)

गोकुळाष्टमीच्या उत्साहात पुरंदर तालुक्यातील सासवड शहर अक्षरशः दुमदुमून गेले. निमित्त होते सासवडच्या मानाच्या आणि स्व. चंदुकाका जगताप यांनी स्थापन केलेल्या कन्हैया दहीहंडी मंडळा' च्या सुवर्णमहोत्सवी यशापलीकडील यंदाच्या ५५ व्या वर्षाच्या भव्य दहीहंडी सोहळ्याचे! तरुणाईचा जोश, पारंपरिक वाद्यांचा गजर आणि एकावर एक थर रचत गोविंदा पथकांनी दाखवलेले अंगावर काटा आणणारे धाडस यामुळे सासवडमध्ये थरांचा अक्षरशः थरार पाहायला मिळाला. यंदाही गोखळी-फलटणच्या प्रसिद्ध 'जय हनुमान' पथकाने आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली. या जिगरबाज पथकाने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने अवघ्या तिसऱ्याच प्रयत्नात तब्बल सात थर रचत उपस्थितांची मने जिंकली आणि कन्हैयाची मानाची हंडी यशस्वीरित्या फोडली. त्यांच्या या नेत्रदीपक व साहसी विजयाने संपूर्ण सासवड नगरीत एकच जल्लोष सुरू झाला. सात थरांचा हा महामेघ यशस्वी करणाऱ्या 'जय हनुमान' पथकाला रोख १ लाख ११ हजार रुपयांचे बक्षीस आणि मानाचा चषक प्रदान करण्यात आला. हंडी फोडणाऱ्या यशस्वी 'पेंद्याचा' विशेष सत्कार ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आला. याप्रसंगी गटनेते अजित जगताप, नगरसेवक प्रदीप राऊत, स्मिता उमेश जगताप, मंडळाचे अध्यक्ष सौरभ जाळिंद्रे, उपाध्यक्ष किरण नागमल, समरादित्य जगताप, चेतन महाजन, प्रल्हाद कावडे, सौरभ रोकडे, अतूल महाजन, वेदांत बोरावके यांच्यासह मंडळाचे आजी-मजी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सासवडकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पारंपरिक वाद्यांच्या तालावर नाचणारा तरुण वर्ग आणि 'गोविंदा आला रे आला'च्या गजराने सासवडमधील हा दहीहंडी सोहळा यंदाच्या वर्षातील एक अविस्मरणीय सोहळा ठरला.

# आदर्श शिक्षक व गुणवंत विद्यार्थ्यांचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते सन्मान

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये सत्यनिष्ठा, देशप्रेम आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवावा- उपमुख्यमंत्री

■ पुणे (दै. संध्या)

शिक्षण हे सर्वात मोठे शस्त्र असून शिक्षक ही राष्ट्राची खरी संपत्ती आहे. विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांवर आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान न देता त्यांच्यामध्ये सत्यनिष्ठा, देशप्रेम आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार, अध्यक्ष चषक आणि शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, आमदार शंकर मांडेकर, बापूसाहेब पठारे, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील तसेच आदर्श शिक्षक, गुणवंत विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, पुणे ही शिक्षणाची पंढरी आहे. महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी याच भूमीत शिक्षणाची ज्योत पेटवली. या समृद्ध शैक्षणिक परंपरेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक हे समाज आणि राष्ट्राचे खरे शिल्पकार असून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्याचे कार्य ते करतात.

पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे. या शाळांमध्ये शिक्षण घेणारी मुले ही ग्रामीण महाराष्ट्राची खरी ताकद असून त्यांच्या गुणवत्ता आणि क्षमतेला योग्य दिशा देण्याचे काम शिक्षकांनी करावे. महाराष्ट्र ही संत, समाजसुधारक आणि शिक्षणतज्ज्ञांची भूमी आहे. राज्यातील अनेक शिक्षकांनी आपल्या कार्यातून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक मिळवला आहे, असेही त्यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या, राज्य शासनाने शिक्षण आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासाला नेहमीच अग्रक्रम दिला आहे. बदलत्या काळानुरूप शिक्षकांनी अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणासोबतच समस्या निराकरण, टीमवर्क आणि मूल्याधारित शिक्षणाची जोड देत त्यांच्यामध्ये सद्गुणांची रुजवणूक करावी. स्पर्धेच्या युगात आत्मविश्वासाने परिस्थितीला सामोरे जाणारी सशक्त पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे.



विद्यार्थ्यांनी वाचन करावे, विचार करावा, प्रश्न विचारावेत, स्वतःचे मत तयार करावे आणि अपयशाची भीती बाळगू नये, असा सल्लाही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिला.

केंद्रप्रमुख हे शिक्षक आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. केंद्रप्रमुखांच्या यशस्वी नेतृत्वामुळे अनेक शाळांनी प्रगती साधली आहे. शिक्षणामुळे सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडतो. स्व. अजितदादांनी नेहमीच महाराष्ट्राच्या तसेच पुणे जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासाला प्राधान्य दिले. प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत अद्ययावत संगणक कक्ष, ई-लर्निंग सुविधा आणि डिजिटल वर्गखोल्या उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांना आधुनिक अध्यापन पद्धतींचे प्रशिक्षण देण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले. राज्याच्या शिक्षण क्षेत्रात सकारात्मक आणि गुणात्मक बदल घडविण्याचा शासनाचा निर्धार असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी मुख्यमंत्री विज्ञानवारी, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सायन्स सेंटर, समूह शाळा, आदर्श शाळा, दत्तक शाळा, प्रवेशोत्सव, आरोग्य तपासणी, सैनिकी शिक्षण, मोफत गणवेश, निपुण महाराष्ट्र अभियान यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षकांचे प्रश्न, शाळांमधील सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी शासन सदैव तत्पर आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे म्हणाले, शिक्षक आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता वृद्धिंगत व्हावी, ही जिल्हा परिषदेची भूमिका आहे. शिक्षकांनी केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे. चांगल्या कामाचे नेहमीच मूल्यमापन केले जाईल. शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न राज्य शासनाने मार्गी लावल्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ४३६ शिक्षक नव्याने रुजू होणार आहेत. शिक्षकांवरील अतिरिक्त कामांचा ताण कमी करण्याबाबतही राज्य शासन लवकरच निर्णय घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांसोबतच सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील बिबट्या प्रवण क्षेत्रातील शाळांना संरक्षक भिंती बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी प्रास्ताविकात जिल्हा परिषद शाळांच्या प्रगतीचा आढावा घेतला. राज्य गुणवत्ता यादीतील ५० टक्के विद्यार्थी पुणे जिल्हा परिषदेचे असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या मिशन ३००, ग्लोबल गुरुजी, शिक्षक सक्षमीकरणासाठी विविध प्रशिक्षण, बालकुमार साहित्य संमेलन, मुलींसाठी सायकल बँक, बालसंसद आदी उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी ५३ शिक्षक, ५२२ गुणवंत विद्यार्थी तसेच अध्यक्ष चषक स्पर्धेतील तीन विजेत्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद सभापती जितेंद्र बडेकर, अमोल नलावडे, अंकिता पाटील, दीपाली हुलावळे, शिक्षणाधिकारी ललिता दहितुले, डॉ. भाऊसाहेब कारेकर तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, शिक्षक, विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.